cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

संपादकीय

मतदार वाढले कसे?

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालावर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुन्हा प्रश्न उपस्थित केला आहे. लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला यश मिळाले आणि सहा महिन्यांनी झालेल्या विधानसभा निवडणुकीत अचानक ७० लाख मतदार कसे वाढले, असा प्रश्न त्यांनी लोकसभेत विचारला तसेच शिर्डीमध्ये एकाच इमारतीत ७ हजार नवे मतदार यादीमध्ये समाविष्ट कसे झाले, असाही प्रश्न त्यांनी केला. ४ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीला आव्हान देणारी याचिका कोर्टात दाखल करण्यात आली आहे.

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२८४ | गुरूवार, दि.६ फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

विकासाची गंगा आणणारे सुरेश धस हे आधुनिक भगिरथ

दुष्काळमुक्त मराठवाड्यासाठी वर्षभरात नदीजोड प्रकल्प सुरु करणार

संतोष देशमुख यांच्या हत्येसारख्या घटना खपवून घेणार नाही–मुख्यमंत्री फडणवीस

आष्टी । प्रतिनिधी

सध्याच्या पिढीने दुष्काळाच्या झळा सोसल्या असून मराठवाडा दुष्काळमुक्त करण्यासाठी येत्या वर्षभरात राज्यात नदीजोड प्रकल्प सुरु करणार असल्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. तसेच संतोष देशमुख यांच्या हत्येसारख्या घटना खपवून घेतल्या जाणार नसून यात कारवाई नक्की होणार असल्याचा विश्वास बीड जिल्ह्यातील जनतेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. सिंचन प्रकल्पा मार्गी लावून विकासाची गंगा या भागात आणणारे सुरेश धस हे आधुनिक भगिरथ असल्याचे गौरोद्गार काढले. बीडमधील आष्टी उपसा सिंचन योजना क्र. ३ अंतर्गत येणाऱ्या शिंपोरा ते खुंटेफळ पाईपलाईन कामाची पाहणी आज देवेंद्र फडणवीसांनी केली. यावेळी बोगदा कामाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

बीडमधील आष्टी उपसा सिंचन योजना क्र. ३ अंतर्गत ◀◀ पान २ वर

सर्व उपसा सिंचन प्रकल्प सोलारवर

राज्यातील उपसा सिंचन प्रकल्पाला वीज मोठ्या प्रमाणात लागते, वीजबील थकल्याने असे प्रकल्प बंद पडतात. परिणामी शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचे राज्य शासनाने याबाबत मोठा निर्णय घेतला असून यापुढे राज्यातील सर्व उपसा सिंचन प्रकल्प हे सोलरवर चालवले जाणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केली. खूंटेफळ उपसा सिंचन प्रकल्प सुध्दा सोलरवर चालवला जाणार असल्याचे ते म्हणाले.

शेतीला दिवसा वीज देण्याचा प्रयत्न

शेतीला दिवसा विज देण्याचा आमचा प्रयत्न असून त्यादृष्टीने काम सुरु केले आहे. शेतीला १६ हजार मेगावॅट विज लागत असून ही सर्व विज सोलर पॅनलवरुन मिळवण्यासाठी काम सुरु केले असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. हे काम पुर्ण होताच शेतीला १२ तास दिवसा विज दिली जाणार असल्याचे फडणवीसांनी सांगितले.

आ. सुरेश धस यांचे खास कौतूक

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात आ. सुरेश धस यांचे खास कौतूक केले. धसांचा आधुनिक भगिरथ असा उल्लेख करीत आष्टी तालुक्यातील सिंचन प्रकल्पाला निधी कमी पडू देणार नाही, असे सांगून आपण विकास कामांसाठी नेहमी सुरेश धस यांच्या पाठीशी असल्याचे सांगितले.

बीड जिल्हा देवेंद्र फडणवीसांसाठी लक्की

पंकजा मुडेंनी सांगितले खास कनेक्शन

आज तरी शासनात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री आणि पंकजा मुंडे मंत्री आहे. तेव्हा मी आले. तुम्ही घरगुती कार्यक्रमाला बोलावलं तर येईल. हा सरकारी कार्यक्रम आहे. बॅनरवर फोटो आहे का हे मी पाहिले नाही. शेतकऱ्यांचा कार्यक्रम आहे, असेही पंकजा मुंडे म्हणाल्या. तसेच बीड जिल्हा हा देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी लक्की असल्याचे सांगून नेमके काय बीडचे कनेक्शन आहे, ते त्यांनी सांगून टाकले आहे.

यावेळी पुढे बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या, देवेंद्रजी एक किस्सा आठवला. तुम्ही जेव्हा सीएम म्हणून बाहुबली म्हणतात. तुम्ही ज्येष्ठ आहात. नेते आहात. तुम्ही कॅबिनेटचे प्रमुख आहात. तुमच्या विषयी आदरभाव नेहमी येतो. पण आज ममत्व भाव येतोय. कारण ते तुम्हाला बाहुबली म्हणत आहेत. काही वर्षांपूर्वी मला शिवगामीणी म्हणत होते. शिवगामीणी ही बाहुबलीची आई आहे. त्यामुळे तुम्हाला बघताना मला आज वेगळाच भाव आला. शिवगामीचं वाक्य असते, सुरेश अण्णा तुम्ही जसे पिक्चर म्हणता. आम्हीही पिक्चरचे वाक्य म्हणतो. शिवगामीणीचे वाक्य असते, मेरा वचनही है मेरा शासन. आणि जे जाहीर वचन सुरेश धस यांना दिले आहे. तेच माझे शासन आहे. गोपीनाथ मुंडेची लेक आहे. बोलणं एक आणि करणं एक माझ्या रक्तात नाही, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.

त्या पुढे म्हणाल्या, सुरेश धसांनी आवर्जून उल्लेख केला. २००३ मधला उल्लेख केला. देवेंद्र जी फडणवीस आपण कदाचित ज्यांना लहानपणापासून पाहत आला. महाजन आणि मुंडेंचा किस्सा सांगितला. अण्णा मी तुम्हाला अण्णा म्हणते बरं का? तुम्ही ताईसाहेब म्हणत नाही. ◀◀ पान २ वर

हा सरकारी कार्यक्रम

आपल्या जिल्ह्यातील नागरिकांसाठी भूमिका घेताना मागे पुढे पाहायचे नाही ही गोपीनाथ मुंडे यांची भूमिका होती. आजच्या कार्यक्रमाला मी येणार की नाही अशी चर्चा होती. का नाही येणार? सुरेश अण्णा तुम्ही आपल्या जयदत्तचे लग्न केले. तेव्हा साडी आणि पत्रिका घेऊन आला होता. सागरचे लग्न कराल तेव्हा बोलावले तर येईल, नाही तर नाही येणार. पण हा कार्यक्रम शासनाचा आहे आणि आज तरी शासन देवेंद्र फडणवीस आणि पंकजा मुंडे मंत्री आहे. तेव्हा मी आले. तुम्ही घरगुती कार्यक्रमाला बोलावले तर येईल. हा सरकारी कार्यक्रम आहे. बॅनरवर फोटो आहे का हे मी पाहिलं नाही. शेतकऱ्यांचा कार्यक्रम आहे, असेही पंकजा मुंडे म्हणाल्या.

फडणवीसांसाठी बीड जिल्हा लक्की

बीडमध्ये सहापैकी पाच आमदार निवडून येतात. तेव्हा तुम्ही मुख्यमंत्री होता. बीड जिल्हा लकी आहे. २०१९ मध्ये बीडमध्ये सहा पैकी पाच आमदार निवडून आले. आता २०२४ मध्ये महायुतीचे ५ आमदार निवडून आले. तुम्ही पुन्हा मुख्यमंत्री झालात. आज अजितदादा पालकमंत्री आहेत. ते आपल्याला नेहमी सहकार्य करतील. जनतेसाठी आम्ही कधीच भेदभाव करणार नाही. पालकमंत्री असताना कधी सुईच्या टोकाएवढाही भेदभाव केला नाही. आम्ही काम करत राहिलो, असे पंकजा मुंडेंनी म्हटले.

मेरे पास देवेंद्र फडणवीस साहेब का आशीर्वाद है!

सुरेस धस यांची आष्टीत तुफान टोलेबाजी

यावेळी बोलताना या योजनेचे शिल्पकार आमदार सुरेश धस म्हणाले की लोक मला हिणवतात तेरे पास क्या है मेरे पास देवेंद्र फडणवीस आहे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची आणि माझी राजकीय कारकीर्द बरोबरच सुरू झाली आहे माझी भाग्य एवढे मोठे आहे की पहिल्या सदस्यत्व वेळी देवेंद्रजींच्या मागच्या बाकावर बसून मी त्यांना कागदपत्र पुरवत असे त्यानंतर देवेंद्रजी फडणवीस यांनी मला ◀◀ पान २ वर

तुम्ही बिनजोड पैलवान

साहेब, माझ्यावर हरळ उगवली असती. २०१९ पासून माझ्याविरोधात कट कारस्थान झाले. माझ्या कुटुंबियांवर कारस्थान झाले. पण तुम्ही माझ्या पाठी दत्त म्हणून उभा राहिला. जनादेश तुमच्या बाजूने होता. पहाटेच आपला जनादेश चोरून नेला. ज्याप्रकारे तुम्हाला राजकीय आणि कौंटुबीक जीवनातून उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. त्यातून आपण शांतपणे बाहेर आला. त्याला तोडच नाही. तुम्ही बिनजोड पैलवान आहात असे यावेळी धस यांनी फडणवीस यांचे कौतूक करताना सांगितले.

शिरुर–पाटोद्याला ३.५ टिएमसी पाणी द्या

उपसा सिंचन प्रकल्पाच्या माध्यमातून आष्टी तालुक्याला ११.६८ टिएमसी पाणी मिळणार असल्याचे जवळपास २८ हजार हेक्टर जमीन ओलीताखाली येणार आहे. आष्टीचा विकास यातून मोठ्या प्रमाणात होणार असून शिरुर आणि पाटोदा तालुक्यासाठी सुध्दा ३.५ टिएमसी पाणी जायकवाडी किंसा माजलगाव धरणातून द्यावे, अशी विनंती आ. सुरेश धस यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली.

मेरे पास देवेंद्र फडणवीस है

मी दिवार सिनेमा पाहिला होता. दिवार. कॉलेजमध्ये असताना. त्यात अमिताभ आणि शशी कपूर भाऊ भाऊ असतात. निरुपा राय त्यांची आई असते. शशी कपूर इन्सपेक्टर असतो. अमिताभ झंटाफंटा दाखवला. अमिताभ शशी कपूरला म्हणतो, मेरेपास गाडी है, बंगला है, नोकर है, चाकर है तुम्हारे पास क्या है त्यावेळी शशी कपूर म्हणतो, मेरे पास माँ है. तसा आईचा आशीर्वाद तुम्हाला आतापर्यंत भेटतोय. तुमच्यासारखा नशिबवान कोणी नाही. माझी आई गेली. वडील गेले. माझी दुसरी आई जिवंत आहे. माझी आई मी लपवली नाही साहेब. सभागृहात मी विचारले माझ्या आईचे नाव घेऊ का. मी माझ्या दुसऱ्या आईचेही नाव घेतले. साहेब, तेव्हा बऱ्याच जणांना वाटले मला काही तरी मिळेल. मला मंत्रीपद नाही दिले तरी, मी म्हणतो मला मंत्रीपद नको, पालकमंत्रीपद नको. काही देऊ नका. हे चार टीएमसी, तिकडचे साडे तीन टीएमसी पाणी द्या असे सांगत धस पुढे म्हणाले की मला हिणवतात. काय आहे याचे मुख्यमंत्र्यापाशी. मला विचारतातेरे पास क्या है. मी म्हणतो मेरे पास देवेंद्र फडणवीस साहेबांचा आशीर्वाद आहे. हा आशीर्वाद असाच ठेवा अशी मागणी धस यांनी यावेळी केली.

श्री मच्छिंद्रनाथ समाधी मंदिराचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन

नाथ संप्रदायाचे सर्वसामान्यांशी नाते; मंदिर परिसर विकासासाठी निधी उपलब्ध करून देणार–मुख्यमंत्री फडणवीस

नाथ संप्रदायाची परंपरा देशातील सर्वात मोठी आणि प्रभावशाली परंपरा मानली जाते. देशभरात नाथ संप्रदायाचे अनुयायी, या परंपरेनुसार साधना करणारे साधू, संत, महंत आहेत, त्यांच्यासमवेत सामान्य माणसांचेही नाथ संप्रदायाशी नाते घट्ट आहे, असे सांगून मंदिर परिसर विकासासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले. सावरगाव (ता. आष्टी, जि. बीड) येथील श्री मच्छिंद्रनाथ समाधी मंदिराचे भूमिपूजन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास जलसंपदा मंत्री (गोदावरी आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील, पर्यावरण आणि हवामान बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, आमदार सुरेश धस, आमदार मोनिका राजळे, श्री क्षेत्र नारायण गड संस्थान, बीडचे महंत शिवाजी महाराज, अश्वलिंग देवस्थान, पिंपळवंडीचे मधुकर महाराज शास्त्री, मदन महाराज संस्थान, कडाचे बबन महाराज बहिरवाल, बंकटस्वामी महाराज संस्थान, नेकपूरचे लक्ष्मण महाराज मेंगडे, ओम शिव गोरक्षनाथ योगी आस्थाना, अहिल्यानगरचे अशोकनाथ पालवे महाराज, नालेगाव, अहिल्यानगरचे मस्तनाथ महाराज आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, नाथ संप्रदायाने भक्तीचा मार्ग दाखविला आहे. या भक्तीमार्गानेच मुक्तीचा मार्ग दाखविला आहे. नाथांनी हे आपल्या आचरणातून सिद्ध केले आहे. मच्छिंद्रनाथ यांचे कार्य सर्वसामान्य जनतेलाही माहीत आहे. मंदिराच्या भूमिपूजनानिमित्त येथे येण्याची संधी मिळाली हे भाग्य समजतो. नाथांच्या आशीर्वादाने पुढील काळातही माझ्या हातून चांगली कामे ◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०४ फेब्रुवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

गहू: १४.०० क्विंटल			
	किमान	कमाल	सरासरी
	२,४७५	३,४००	२,८९१
ज्वारी/हायब्रिड: ६९.५० क्विंटल			
	१,६००	२,६९१	२,२३५
मका/लोकल:५.०० क्विंटल			
	२,२०१	२,२०१	२,२०१
तूर : ६३.०० क्विंटल			
	६,३५१	७,०१०	६,८२४
उडीद : ६.०० क्विंटल			
	५,०००	६,३००	५,६५०
बाजरी: १६.०० क्विंटल			
	२,०५०	३,२००	२,६२९
मुग : १.०० क्विंटल			
	६,५००	६,५००	६,५००
सोयाबीन: १०३.०० क्विंटल			
	३,९११	४,०११	३,९८५
हरभरा: ३.०० क्विंटल			
	५,६०१	५,६०१	५,६०१

खा.सोनवणेंनी अधिकाऱ्यांसमवेत केली रेल्वे चाचणीची पाहणी

बीड : बीडकरांचे अनेक वर्षांचे रेल्वेचे स्वप्न आता पुर्ण होत असून दि.५ रोजी नवगण राजुरी ते बीड रेल्वेची जलदगती चाचणी झाली. सकाळी दहा वाजता खा.बजरंग सोनवणे यांनी पालवण परिसरातील रेल्वे चाचणी स्थळावर भेट दिली. यावेळी अंमळनेर ते बीड रेल्वे मार्गातील नागरिकांनी त्यांच्याकडे मांडलेल्या समस्या अधिकाऱ्यांना सांगून त्या समस्या ताडतीने मार्गी लावण्याच्या सुचना यावेळी दिल्या.

रेल्वे पाहणी वेळी खा.बजरंग सोनवणे यांच्यासोबत रेल्वे विभागाचे आयुक्त मनोज आरोरा, आ.संदीप क्षीरसागर, मा.आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी(शप)चे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, गणेश वरेकर, शेख निजाम, भागवत तावरे, बाळासाहेब मोरे, दुष्यंत डोंगरे, बद्रीनाथ जटाळ यांची उपस्थिती होती. मागील अनेक वर्षांपासून बीडकर रेल्वेचे स्वप्न पाहत आहेत. यासाठी अनेकांनी लढा दिलेला आहे. ◀◀ पान २ वर

रेल्वे पुलांचा विषय आ.क्षीरसागरांनी रेल्वे सुरक्षा आयुक्तांसमोर मांडला

बीड । प्रतिनिधी

बीड मतदारसंघातील काही ठिकाणी रेल्वे ब्रीज नसल्यामुळे वाहतुकीस अडचण होत आहे. याबाबत आ.संदीप क्षीरसागरांचा गेल्या अनेक दिवसांपासून पाठपुरावा सुरू आहे. दरम्यान बुधवारी (दि.५) रोजी बीड रेल्वेची हाय स्पीड टेस्ट करण्यासाठी रेल्वेचे सुरक्षा आयुक्त मनोज अरेरा आले असता त्यांच्यासमोर आ.संदीप क्षीरसागर यांनी ◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

मतदार वाढले कसे?

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालावर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुन्हा प्रश्न उपस्थित केला आहे. लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला यश मिळाले आणि सहा महिन्यांनी झालेल्या विधानसभा निवडणुकीत अचानक ७० लाख मतदार कसे वाढले, असा प्रश्न त्यांनी लोकसभेत विचारला तसेच शिर्डीमध्ये एकाच इमारतीत ७ हजार नवे मतदार यादीमध्ये समाविष्ट कसे झाले, असाही प्रश्न त्यांनी केला. ४ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीला आव्हान देणारी याचिका कोर्टात दाखल करण्यात आली आहे.

वंचित बहुजन आघाडीचे प्रतिनिधी चेतन अहिरे यांची रीट याचिका मुंबई उच्च न्यायालयाने स्वीकारली आहे. भारतीय संघ, भारतीय निवडणूक आयोग, महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी या याचिकेतील प्रतिवादी आहेत. महाराष्ट्रात गत पाच वर्षांत मतदारांची संख्या ३२ लाखांनी वाढली, मग लोकसभा निवडणुकीनंतर केवळ सहा महिन्यांत मतदारांची संख्या ४८ लाखांनी कशी वाढली असा प्रश्न काँग्रेसने उपस्थित केला आहे. राष्ट्रीय मतदान दिनानिमित्त काँग्रेसने पुन्हा एकदा मतदारयादीत त्रुटी असल्याची टीका केली आहे. तसेच आघाडीच्या १०० पराभूत उमेदवारांनी या संदर्भात विविध न्यायालयांत याचिका दाखल केल्या आहेत. विधानसभा निवडणुकीत सहा वाजल्यानंतर सुमारे ७५ लाख मतदारांनी मतदान केले.

परंतु प्रत्यक्ष मतदान आणि मिळालेली मते यात मोठी तफावत असल्याचा दावा करून ही निवडणूक रद्दबातल घोषित करण्याच्या मागणीसाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. न्यायालयाने या याचिकेची दखल घेऊन केंद्रीय मुख्य निवडणूक आयोग आणि राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना नोटीस बजावली आणि भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. अहिरे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्या. अजय गडकरी आणि न्या. कमल खाता यांच्या खंडपीठासमोर सोमवारी सुनावणी झाली. त्यावेळी याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी मतदानाच्या दिवशी शेवटच्या टप्प्यात मोठ्या प्रमाणात मतदान झाल्याची विशेष करून मतदान संपल्यावर सायंकाळी सहानंतर निवडणूक आयोगाकडून मतदान केंद्रावर मिळणा-या टोकनशिवाय मतदान झाल्याची बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली.

त्यावर मतांच्या संख्येत तफावत झाल्याचा दावा कोणत्या आधारावर करत आहात अशी विचारणा न्यायालयाने केली. मुख्य निवडणूक अधिका-यांनी माहितीच्या अधिकारांतर्गत ही माहिती दिल्याचा दावा आंबेडकर यांनी केला. मतदानाच्या शेवटच्या तासात सुमारे ७५ लाखांपेक्षा जास्त मतदान झाले. या मतांची नोंद किंवा सत्यता पडताळण्यासाठी पारदर्शक प्रणाली प्रदान केलेली नाही. ९५ मतदारसंघांमध्ये झालेले मतदान आणि निकालाच्या वेळी मिळालेल्या मतांमध्ये तफावत आहे. मतदानाच्या दिवशी सायंकाळी पाच वाजल्यापासून ते मतदानाची वेळ संपेपर्यंत सुमारे ६.८० टक्के मतदान केल्याकडेही याचिकेत लक्ष वेधण्यात आले आहे. प्रत्यक्ष मतदान आणि मिळालेल्या मतांमध्ये तफावत आढळल्यास संबंधित निवडणूक अधिका-याने निकाल जाहीर करू नये असा नियम आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निदर्शनास ही बाब आणून दिल्याचे याचिकेत म्हटले आहे. अहिरे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर पुढील सुनावणी १७ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

निवडणूक प्रक्रियेत अनियमितता झाली, सायंकाळी सहानंतर झालेल्या मतदानातील घोळ, त्याबाबतची कागदपत्रे आणि सीसीटीव्ही फुटेज देण्यास निवडणूक आयोगाने दिलेला नकार आदी मुद्दे या याचिकेत उपस्थित करण्यात आले आहेत. संसदेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावर बोलताना विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शिर्डी येथील नवीन मतदारांचा प्रश्न उपस्थित केला. शिर्डीच्या एका इमारतीमध्ये ७ हजार नवमतदार वाढले. याबाबत आपण आरोप करत नाही परंतु काही ना काही संशयास्पद आहे असे ते म्हणाले. हिमाचल प्रदेशातील लोकसंख्येइतके मतदार नव्याने समाविष्ट झाले. आम्ही निवडणूक आयोगाकडे लोकसभा मतदारयादी, नाव आणि पत्ते मागितले आहेत. नवे मतदार प्रामुख्याने अशा मतदारसंघात वाढले आहेत,

जिथे भाजप पराभूत झाली होती. हा डेटा आमच्याकडे आहे. निवडणूक आयुक्तांची निवड पंतप्रधान, विरोधी पक्षनेते आणि सरन्यायाधीशांच्या समितीमार्फत केली जायची पण आता सरन्यायाधीशांना समितीमधून का हटवण्यात आले असा सवाल राहुल गांधी यांनी केला. आता पंतप्रधान मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि विरोधी पक्षनेता समितीमध्ये आहेत. मोदी आणि शहा बहुमताने निर्णय घेणार आणि विरोधी पक्षनेत्याला त्यांचा निर्णय मान्य करावा लागणार. सरन्यायाधीश सदस्य असते तर समितीमध्ये सविस्तर चर्चा झाली असती. त्यामुळे समितीच्या बैठकीला विरोधी पक्षनेते जायचे कशाला हा राहुल गांधी यांना पडलेला प्रश्न रास्तच म्हणावा लागेल. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधी सोहळ्याचे पंतप्रधान मोदींना निमंत्रण नव्हते.

परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर त्यासाठी मध्यस्थी करण्याकरिता अमेरिकेला गेले होते असा गंभीर आरोप राहुल गांधी यांनी लोकसभेत केला. यावर संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी आक्षेप घेतला. जयशंकर यांनीही 'एक्स'वरील संदेशात राहुल गांधी यांचा दावा फेटाळून लावला. राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदींची 'मेक इन इंडिया' संकल्पना चांगली होती असे म्हटले परंतु उत्पादनाच्या बाबतीत ही योजना फेल झाल्याची टीकाही त्यांनी केली. आपण एक देश म्हणून उत्पादन वाढवण्याच्या बाबतीत अपयशी ठरलो आहोत. आपला फोन दाखवत राहुल म्हणाले, हा फोन भारतात बनलेला नाही, केवळ भारतात असेंबल केला आहे. यातील सर्व पार्ट चीनमध्ये बनवले आहेत असे सांगत मोदी सरकारवर निशाणा साधला. बेरोजगारीच्या समस्येवरही आपण मार्ग काढू शकलो नाही. देशातील युवकांना रोजगाराविषयी कोणतेही ठोस उत्तर देता आलेले नाही. राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी निवडणूक आयोगावर निशाणा साधताना निवडणूक आयोगाने वाढवलेल्या मतदारांमुळे महायुतीचा विजय झाल्याचा आरोप केला. चव्हाण म्हणाले, गत पाच वर्षांत ३२ लाख मतदारांची संख्या वाढली आहे. पण गत ५ ते ६ महिन्यांत ७६ लाख मतदारसंख्या झाली. म्हणजे सुमारे ५० लाख अतिरिक्त मतदार वाढले. यातील बहुतेक मतदान महायुतीच्या बाजूने झाले. महाराष्ट्रात लोकसभा निवडणूक इंडिया आघाडीने जिंकली होती. त्यानंतर सहा महिन्यांत विधानसभा निवडणुकीत ७० लाख नव्या मतदारांची नावे यादीमध्ये समाविष्ट केली गेली. इतक्या मोठ्या संख्येने अतिरिक्त मतदार कसे वाढले? गोलमाल है भाई गोलमाल है!

सौर कृषी पंप १०० दिवसांचे उद्दिष्ट अवघ्या ६० दिवसात पूर्ण

जिल्ह्यातील १७ हजार ९४४ शेतकऱ्यांना सौरकृषी पंपाचा लाभ

बीड । प्रतिनिधी

मुख्यमन्त्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने निश्चित केलेल्या शंभर दिवसांच्या उद्दीष्टांपैकी 'मागेल त्याला सौर कृषी पंप योजने'त ५२,७०५ सौर पंप बसविण्याचे उद्दीष्ट महावितरणने साठ दिवसात पूर्ण केले, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दि. ५ डिसेंबर २०२४ रोजी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर शंभर दिवसात म्हणजे दि. १६ मार्च २०२५ पर्यंत विविध विभागांसाठी उद्दीष्टे निश्चित करण्यात आली आहेत. महावितरणने या कालावधीत मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत एकूण दीड लाख पंप बसविण्याचा टप्पा गाठण्याचे उद्दीष्ट ठरविण्यात आले होते. दि. ६ डिसेंबर रोजी ९७,२९५ सौर कृषी पंप बसविण्यात आले होते. त्यानंतर दि. ४ फेब्रुवारीपर्यंत महावितरणने ५३,००९ सौर कृषी पंप बसविले. त्यामुळे मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत आतापर्यंत बसविलेल्या पंपांची संख्या १,५०,३०४ झाली आहे. महावितरणला शंभर दिवसात ५२,७०५ पंप बसवायचे उद्दीष्ट होते पण साठ दिवसात ५३,००९ सौर पंप बसविण्यात आले. राज्यात ४ फेब्रुवारी अखेर बसविलेल्या १,५०,३०४ सौर कृषी पंपांमध्ये जालना (१८,४९४ पंप), बीड (१७,९४४), अहिल्यानगर (१३,३६६), परभणी (११,७५५), संभाजीनगर (९,३२९), नाशिक (९,१४३), हिंगोली (८,५३८), धाराशीव (६७६५) आणि जळगाव (६६४८) या जिल्ह्यांनी आघाडी घेतली आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप या राज्य सरकारच्या योजनेत केंद्र सरकारकडून ३० टक्के आणि राज्य सरकारकडून ६० टक्के अनुदान मिळते. त्यामुळे शेतकऱ्यांना केवळ दहा टक्के रक्कम भरून सौर ऊर्जा निर्मिती करण्याचे सौर पॅनेल्स, कृषी पंप असा संपूर्ण संच मिळतो. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांसाठी लाभार्थी हिस्सा ५ टक्के असून त्यांना ९५ टक्के अनुदान मिळते. सौर कृषी पंप बसविल्यावर शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज उपलब्ध होत असल्याने त्यांची अनेक दशकांची मागणी पूर्ण होते. हे पंप वीजजाळ्यावर अवलंबून नसल्याने शेतकरी दिवसा हव्या त्या वेळेला सिंचन करू शकतो. सौर ऊर्जानिर्मिती पॅनेल्समधून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने तेवढा काळ कृषी पंपासाठी वीजबिलातून मुक्तता होते. सौर ऊर्जेचा वापर केल्यामुळे पर्यावरण रक्षणाला मदत होते. सौर कृषी पंप बसविण्याच्या बाबतीत महाराष्ट्र राज्याने देशात आघाडी घेतली आहे. गेल्या वर्षभरात या मोहिमेला विशेष गती आली आहे. राज्यात २०१५ पासून नऊ वर्षात महावितरणने १,०६,६१६ सौर कृषी पंप विविध योजनांच्या अंतर्गत बसविले होते. तथापि, जानेवारी २०२४ ते फेब्रुवारी २०२५ पर्यंत दीड लाख पंप बसविले आहेत.

ऊसतोडणी कामगारांच्या अनाथ मुलासाठी मदत फेरी काढून ७५ हजार रुपयांचा निधी जमा

वडवणी । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील वारोळा तांड्यातील बंजारा समाजातील ऊसतोडणी मजूर कारखान्यावरुण परत येत असताना ट्रॅक्टर पलटी होऊन अनिल आणि त्यांची पत्नी आरती हे जागीच ठार झाले होते त्यांच्या पश्चात तीन चिमुकले मुलं असुन या अनाथ झालेल्या लेकरांच्या मदतीसाठी काल दिनांक ५ फेब्रुवारी रोजी वडवणी शहरात मदत फेरी काढण्यात आली होती या मदत फेरीला वडवणी तालुक्यातील बांधवांनी चांगले सहकार्य केले असून पंच्याहत्तर हजार रुपये एवढा निधी जमा झाला आहे.

आठ दिवसांपूर्वी माजलगाव तालुक्यातील वारोळा तांड्यातील बंजारा समाजातील अनिल आणि आरती हे पती -पत्नी ऊसतोडणीचे काम संपल्यानंतर आपल्या गावी परत येत असताना ट्रॅक्टर पलटी झाला होता व या अपघातात ते जागीच मृत्यू मुखी पडले होते. मयत राठोड यांच्या पश्चात दोन मुलं आणि एक मुलगी असुन हे चिमुकले मुलं अनाथ झाले आहेत,या चिमुकल्या लेकरांना मदतीचा हात पुढे करण्याचे आवाहन केल्यानंतर बीड जिल्ह्यातुन आणि राज्याच्या विविध भागातून अनेक लोकांनी मदतीचा हात पुढे केला होता, याचाच एक भाग म्हणून आज वडवणी शहरात मदत फेरी काढण्यात आली होती या मदत फेरीला सर्व बांधवांनी चांगले सहकार्य केले त्याबद्दल आम्ही त्यांचे मनापासून आभार व्यक्त करतो. या मदत फेरीत बी एम पवार, संतोष पवार, गिण्यांदेव राठोड, विलास राठोड,राजेभाऊ पवार, , तुकाराम आडे, सुनील चव्हाण, परमेश्वर राठोड, दत्ता राठोड, आबासाहेब पवार, अप्पासाहेब पवार, सुभाष राठोड, नवनाथ पवार, अर्जुन पवार, शहादेव राठोड, विकास चव्हाण, बाळासाहेब चव्हाण,पपेस चव्हाण, एकनाथ पवार,आसाराम आडे, अतुल पवार , अण्णासाहेब लांडे यांच्यासह अनेक लोकांनी सहभागी घेतला होता.

श्री संत मीराबाई आईसाहेब संस्था महासांगवी इथे ह.भ.प नंदिनीताई महाराज यांचे कीर्तन संपन्न

पाटोदा । पतिनिधी

दिनांक ५फेब्रुवारी २०२५ रोजी श्री संत मीराबाई आईसाहेब संस्था पुण्यतिथी सोहळा निमित्त. नंदिनीताई महिंद यांचे कीर्तन सेवा महासांगवी संपन्न झाले असून ह.भ.प नंदिनीताई महाराज महिंद यांचे विचार ऐकण्यासाठी महासांगवी कवडवाडी पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या प्रमाणात उपस्थित होते नंदिनीताई महाराज महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार असून त्यांच्या अमृतवाणीतून कीर्तन ऐकण्यासाठी मोठ्या प्रमाणात लोक उपस्थित होते. त्यांनी आपल्या कीर्तनातून माणसाला जीवनात शांती हवी असेल तर आळंदीला न्यानेश्वर माऊली पैठणला नाथ महाराजांकडे जावे. पुढे . गुरुनिष्ठ कशी असावी असावी हे. मास्ती कडून शिकावे त्यांनी आपले विचार कीर्तनातून मांडलेत्या म्हणाल्या संतांची कृपा झाली तर जीवनात काही कमी पडत नाही. श्री संत मीराबाई आईसाहेब संस्थान महासंघी पुण्यतिथी सोहळा निमित्त त्यांनी आपले कीर्तन रुपी सेवा संपन्न झाली.

ताशी १४० प्रति कि मी ने झाली हायस्पीड रेल्वे चाचणी

बीडमध्ये रेल्वे कृती समितीने केले रेल्वे इंजिनचे पूजन

बीड । प्रतिनिधी

अहमदनगर बीड परळी या रेल्वेमार्गाला आता चांगलीच गती मिळाली असून आज अहमदनगर ते बीड हायस्पीड रेल्वे चाचणी घेण्यात आली प्रति तास १४० किमी ने हि चाचणी यशस्वी झाली आणि बीडकरांनी आनंदोत्सव साजरा केला बीड रेल्वेस्थानकावर स्वतंत्र सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समितीच्या वतीने रेल्वे इंजिनचे पूजन करण्यात आले त्यांनतर रेल्वे अधिकार्याचा सत्कार देखील करण्यात आला.

जिल्हावासियांच्या दृष्टीने आजचा दिवस सोनेरी पहाट घेवून उगवला. गेल्या अनेक दशकांपासूनचे स्वप्न आज रेल्वे पाहिल्यानंतर पुर्णत्वास जात असल्याचे चित्र बीडच्या रेल्वे स्टेशनवर पहायला मिळाले. विघनवाडी येथील रेल्वे स्टेशनवरून निघालेली रेल्वे १४० च्या स्पीडनेआज दुपारी १.४५ वाजता बीडच्या रेल्वे स्टेशनवर येवून थांबली. उपस्थित बीडकरांनी रेल्वेचे उत्स्फुर्तपणे स्वागत केले. बीडच्या स्टेशनवर येताच सीआरएस टीममधील रेल्वेच्या वरिष्ठ अधिकार्यांनी

प्लॉट फॉम क्रमांक १ च्या बाजुला वृक्षारोपन केले. दरम्यान बीडकरांच्या स्वप्नपुर्तीचा आनंद गंगनात मावेनासा झाला असून खा.बजरंग सोनवणे, आ.संदीप क्षीरसागर यांनीही नवगणराजुरी येथील रेल्वे स्थानकाला भेट देवून रेल्वे अधिकार्यांशी चर्चा केली. त्यानंतर हि रेल्वे बीडच्या स्थानकावर आली बीड शहरातील पालवण रोडवरील रेल्वे स्टेशनवर आलेली रेल्वे पहाण्यासाठी बीडकरांनी मोठी गर्दी केली होती. गेल्या अनेक वर्षांपासूनचे स्वप्न पुर्ण होत असल्याने बीड शहराती रेल्वे संघर्ष समितीचे पदाधिकारी, जेष्ठ नागरिकांनी स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर उभे राहून रेल्वेचे स्वागत केले.यावेळी रेल्वे मागणी आंदोलन समितीच्या वतीने रेल्वे इंजिनचे पूजन केले त्यानंतर समितीच्या वतीने रेल्वे अधिकार्याचा सत्कार केला त्यात रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा यांचे स्वागत समितीचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा अशोक शेटे यांनी सोइओ अविनाश पांडे यांचा सत्कार जेष्ठ सदस्य सत्यनारायण लाहोटी आणि चंपावतीपत्र चे संपादक सुनील क्षीरसागर यांनी,सीई यादव यांचा सत्कार सुरेश मेखे व लाईक अहमद यांनी ,अभियंता लोळगे यांचा सत्कार शांतीलाल पटेल मंगेश लोळगे आणि डॉ अरुण भश्मे यांनी ,तर राजीवजी वर्मा यांचा सत्कार संपादक रामचंद्र जोशी सुरेश बुद्धदेव आणि आपासाहेब शिंदे यांनी केला यानंतर समितीच्या सदस्यांनी अधिकार्यांशी रेल्वेच्या प्रश्नावर चर्चा केली.

पान १वरून...

दुष्काळमुक्त मराठवाड्यासाठी वर्षभरात

येणाऱ्या शिंपोरा ते खुंटेफळ पाईपलाईन कामाची पाहणी तसेच बोगद्याच्या कामाचे भूमिपूजन देवेंद्र फडणवीसांनी केले. या प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसल, जलसंपदा मंत्री डॉ. राधशकृष्ण विखे पाटील, मंत्री पंकजा मुंडे, नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज, खा. बजरंग सोनवणे, आ. सुरेश धस, आ. मोनिका राजळे, आ. प्रकाश सोळंके, आ. विजयसिंह पंडीत, आ. संदिप क्षीरसागर, आ. नमिता मुंदडा आदि उपस्थित होते. फडणवीस म्हणाले, संतोष देशमुख यांच्या हत्येसारख्या घटना कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतल्या जाणार नाहीत. कोणीही असो प्रत्येकावर कारवाई होईल हा विश्वास मी तुम्हाला देतो. माझी बीडच्या जनतेला विनंती आहे की आपण छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे आहोत. छत्रपती शिवाजी महाराजांनी १८ पगड जातींनी एकत्र करुन स्वराज्याचा स्थापना केली. आपल्यालाही अशाच प्रकारे सर्वांना एकत्र नांदायचे आहे आणि एक नवीन बीड आपण तयार करु, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. बीडचा जो इतिहास सुरेश धस किंवा पंकजा मुंडेंनी सांगितला इतकी मोठी लोक आपल्याला बीडने दिली आहेत. तोच इतिहास पुढे जाईल आणि एक गौरवशाली बीडचा इतिहास तयार करण्यासाठी आपल्या सर्वांचे जे प्रयत्न आहेत, त्या प्रयत्नांच्या पाठीशी मी देखील ठामपणे उभा राहिन, इतकंच या निमित्ताने सांगतो, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले. मराठवाड्याच्या सिंचनाबाबत बोलताना फडणवीस म्हणाले, या पिढीने मराठवाड्यात दुष्काळ पाहीला आहे, येणाऱ्या पिढीवर दुष्काळ पाहण्याची वेळ येऊ नये यासाठी राज्यात चार नदीजोड प्रकल्प हाती घेतले जाणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी याबाबत चर्चा झाली असून त्यांनी सकारात्मकता दाखवली आहे. प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना त्यांनी दिल्या असून वर्षभरात राज्यात चारही नदीजोड प्रकल्प सुरु होतील. हे प्रकल्प पुर्ण झाल्यावर वाहून जाणारे ५३ टिएमसी पाणी मराठवाड्याला मिळणार असून ते पाणी गोदावरी खोऱ्यात सोडणे शक्य होईल. त्यावेळी मराठवाड्याला कधीही दुष्काळाचा सामना करावा लागणार नाही, असे फडणवीस म्हणाले. तसेच आ. सुरेश धस यांचा आधुनिक भगिरथ असा मुख्यमंत्र्यांनी खास उल्लेख केला.

मेरे पास देवेंद्र फडणवीस साहेब

राजकीय संकटातून बाहेर काढले नाही तर माझ्यावर हरळ उगवली असती त्यांनी माझ्यावर विधान परिषदेच्या निवडणुकीची जबाबदारी सोपवली त्यांनी आणि पंकजाताई मुंडे यांनी मदत दिल्यामुळे मी विधान परिषदेचा आमदार झालो देवेंद्रजी फडणवीस यांनी मला भरपूर काही दिले आहे त्यांचा आशीर्वाद सतत माझ्या मागे कायम राहील लोक मला हे नव्हतात तेरे पास के आहे मात्र मेरे पास देवेंद्र फडणवीस आहे मला मंत्रीपद मिळवून न मिळो मला काहीही देऊ नका परंतु माझ्या आष्टी पाटोदा तालुक्यासाठी चार टीएमसी पाणी मराठवाड्याच्या हक्काचे असलेले लवकरात लवकर मंजूर करा मी जिवंत राहील न राहील परंतु तुमच्या या कामामुळे माझ्या नंतर देखील भारतीय जनता पार्टीचा आमदार आष्टी विधानसभा मतदारसंघात निवडून येईल या कामाची आम्हाला केवळ देवेंद्र फडणवीस यांच्याकडून अपेक्षा आहे बाहुबली असलेले देवेंद्र फडणवीस हेच आमचे काम करतील असा विश्वास आहे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले हा प्रकल्प म्हणजे माझा ड्रीम प्रोजेक्ट असून या योजनेला सुरुवात करत असताना मी येथील लोकांचे दगड गोटे खाल्ले आहेत त्याच त्यात योजनेसाठी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस या ठिकाणी आले असून ज्यांनी विरोध केला ते सर्वजण या कार्यक्रमाला उपस्थित आहेत मी या विरोधकांची मने वळवण्यात यशस्वी झालो त्यांच्याच जमिनी आम्ही घेऊन आम्ही हा प्रकल्प करत आहोत त्यांच्या या योगदानामुळे त्यागामुळेच हा प्रकल्प होत आहे असे सांगत आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांनी या योजनेला पहिल्या अधिवेशनातच ३०० कोटी रुपये दिले आहेत त्यामुळे मराठवाड्याच्या हक्काचे यापुढे चार टीएमसी पाणीदेखील मुख्यमंत्री मिळवून देतील असा विश्वास वाटत आहे असे सांगत त्यांनी गोदावरी खोऱ्यातील येणाऱ्या ते पण टीएमसी पाण्यातून साडेतीन टीएमसी पाणी शिरूर आणि पाटोदा तालुक्यासाठी आणण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत त्यामुळे देवेंद्रजी फडणवीस यांनी आष्टी विधानसभा मतदारसंघासाठी लागणारे आवश्यक पाणी शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावे एवढीच त्यांना आपली मागणी आहे असे सांगितले

बीड जिल्हा देवेंद्र

जशाला तसे आहे आपले प्रेमाचे नाते. इज्जत आम्हीही देतो. पण मला आनंद वाटला. तुम्ही २००३ चा उल्लेख केला. मुख्यमंत्री महोदय मी तुम्हाला आठवण करून देतो. या ठिकाणी सैनिकी छावणी होण्याचा प्रस्ताव जॉर्ज फर्नांडिस असताना झाला. यावेळी प्रमोद महाजन यांना गोपिनाथ मुंडे यांनी २००३च्या जानेवारीत पत्र दिलं. आणि १९ फेब्रुवारी २००३ जॉर्ज फर्नांडिस यांना पत्र दिलं. हे ४० गावं माझी आहेत. इथं सैनिकी छावण्या करू नका. इथे शेती आहे. बागायती आहे. उपसा जलसिंचन योजना करा, असे त्या पत्रात म्हटले होते. सुरेश धस यांनी त्याचा आवर्जुन उल्लेख केला, अशी आठवणही पंकजा मुंडेंनी करुन दिली.

श्री मच्छिंद्रनाथ समाधी मंदिराचे

होतील असे सांगून मंदिर परिसर विकासाच्या विविध कामांना पुरेसा निधी उपलब्ध करून दिला जाईल. रोप वेबाबत केंद्रीय नितीन गडकरी यांच्याशी चर्चा करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले. भारत हा भाविकांचा देश आहे. सध्या प्रयागराज येथे कुंभमेळा सुरू आहे. तेथे आतापर्यंत कोट्यवधी भाविकांनी गंगेत स्नान केले आहे. भारतावर अनेक परकीय आक्रमणे झाली. मात्र, भक्तीमार्गामुळे आपली संस्कृती आणि संस्कार टिकून राहिले. वारकरी संप्रदाय आणि विविध पंथांनी ईश्वरी विचारांना आणि संस्कृतीला जिवंत ठेवले. मच्छिंद्रनाथांचे आशीर्वाद घेताना भक्ती आणि माणुसकीचा संदेश आपल्याला मिळतो, असेही मुख्यमंत्री म्हणाले. आमदार सुरेश धस आणि मोनिका राजळे यांनी भाविकांची वाढती गर्दी पाहता कानिफनाथ मंदिरापासून मच्छिंद्रनाथ मंदिरापर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरणाची आवश्यकता असल्याचे सांगितले. तसेच मच्छिंद्रनाथ मंदिरापासून कानिफनाथ मंदिरापर्यंत रोप वे तयार व्हावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त केली. मच्छिंद्रनाथ देवस्थानचे अध्यक्ष दादासाहेब चितळे, तर सचिव बाबासाहेब म्हस्के व कोषाध्यक्ष रमेश ताठे यांच्यासह सर्व विश्वस्तांनी मान्यवरांचे स्वागत केले.

रेल्वे पुलांचा विषय आ.क्षीरसागरांनी

हा विषय मांडला. बीड मतदारसंघातील क्षेत्रांतर्गत शिरूर कासार तालुक्यातील हिवरसिंगा, बरगवाडी, जवळागिरी तसेच बीड तालुक्यातील चर्हाटा येथे जाण्यासाठी रेल्वे पूल करण्यात आला नाही. त्यामुळे या गावांमध्ये वाहतुकीस मोठी अडचण होत आहे. याबाबत आ.संदीप क्षीरसागरांचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. शासन आणि प्रशासनाकडे याविषयी आ.क्षीरसागर यांनी अनेकवेळा पत्रव्यवहार आणि बैठका घेतल्या आहेत. यावेळीही, अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गाची जलदगती चाचणी करण्यासाठी पुणे विभागाचे रेल्वे वाहतूक सुरक्षा आयुक्त मनोज अरेरा यांच्यासह रेल्वे प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी आले असता आ.संदीप क्षीरसागर यांनी अधिकाऱ्यांची भेट घेऊन रेल्वे पुलांचा विषय त्यांच्यासमोर मांडला. तसेच रेल्वे विभागाने याबाबतचा सविस्तर प्रस्ताव याप्रकरणी तोडगा काढण्यासाठी कार्यवाही करण्याची मागणी केली. याप्रसंगी खा.बजरंग सोनवणे, माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष गणेश वरेकर आदी उपस्थित होते.

खा.सोनवणेंनी अधिकाऱ्यांसमवेत

खा.बजरंग सोनवणे यांनी खासदार झाल्यानंतर दुसऱ्याच दिवसांपासून रेल्वेच्या कामाला गती देण्यासाठी प्रयत्न सुरू केले आणि आज या प्रयत्नांना यश येताना दिसत आहे. दि.४ व ५ फेब्रुवारी रोजी रेल्वे विभागाने विघनवाडी ते बीड रेल्वेमार्गावर जलदगती रेल्वेची चाचणी घेतली. बुधवारी सकाळी दहा वाजता खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वे ट्रॅकवर जात चाचणीची पाहणी करून अधिकारी व परिसरातून आलेल्या नागरिकांशी संवाद साधला. यावेळी शिरूर तालुक्यातील हिवरसिंगा आणि बरगवाडी या गावांमध्ये रेल्वे पुलाचा अभाव असल्यामुळे स्थानिक नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच, बीड तालुक्यातील चऱ्हाटा गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावरही रेल्वे ब्रिज नसल्याने वाहतूक व्यवस्थेला अडथळा निर्माण होत आहे. या संदर्भात रेल्वे विभागाने प्रस्ताव तयार करून आवश्यक तोडगा काढावा असे निर्देश दिले. बीड शहराजवळ अंतिम टप्प्यात सुरू असलेल्या रेल्वे चाचणीच्या ठिकाणी पुणे रेल्वे विभागाचे अधिकारी आणि रेल्वे वाहतूक सुरक्षा आयुक्त मनोज आरोरा यांची भेट घेऊन सर्व प्रश्न मार्गी लावण्याच्या सुचना केल्या. यावेळी मनोज आरोरा यांनी संबंधित समस्यांबाबत आढावा घेतो, ज्या ठिकाणी आवश्यकता आहेत, त्याठिकाणी ब्रिज आणि इतर मार्ग काढले जातील, असा विश्वास दिला.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि. ६ फेब्रुवारी २०२५

बोगस विमा प्रकरणात ९६ सीएससींवर कारवाई,२२ आयडी एकट्या परळीतील

मुंबई । प्रतिनिधी

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२४ मध्ये पीक विमा पोर्टलवर बोगस विमा भरण्यात आला होता. भौगोलिक क्षेत्र नसलेल्या गावात अवैध पीक विमा भरणाऱ्या राज्यासह परराज्यातील ९६ सीएससींचे आयडी ब्लॉक करण्यात आले आहेत. यात बीड जिल्ह्यातील ३५, तर २२ हे माजी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांचा मतदारसंघ असलेल्या परळीमधील आहेत.

बीड जिल्ह्यातील शासकीय जमीन शेत दाखवून काहींनी बनावट पीक विमा भरल्याचे प्रकरण समोर आले होते. त्यानंतर राज्यभरातील पीक विमा पडताळणीला सुरुवात झाली होती. राज्यातील इतर जिल्ह्यातही असा प्रकार आढळून आला होता. परभणी जिल्ह्यात खोट्या कागदपत्रांद्वारे बोगस पीक विमा भरला होता. कोणतेही भौगोलिक क्षेत्र अस्तित्वात नसताना तेथे खोटे सातबारा, आठ-अ सारखे महसुली अभिलेख तयार करून एकूण ९६ सीएससी आयडीधारकांच्या आयडीमधून पीक विमा

नोंदणी करून शासनाची फसवणूक करण्यात आली होती. त्यामुळे सदरील ९६ सीएससी आयडी ब्लॉक करण्याची सूचना कृषी संचालक विनयकुमार आवटे यांनी सीएससी कंपनीला केली होती.

भारत ही बुद्धभूमी : बाबासाहेबांच्या विचारांची जगाला गरज विपश्यनासाठी ही भुमी योग्य -पुज्य भिक्खू डॉ.लि.ची.रान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील वसंतनगर तांडा, मौजे चांदापुर (तिर्थक्षेत्र दर्जा - क प्राप्त) येथे प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षी ही रविवार, दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी अकराव्या बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या धम्म परिषदेला अखिल भारतीय भिक्खू महासंघाचे कार्याध्यक्ष पुज्य भदन्त डॉ.उपगुप्त महाथेरो (पुर्णा) यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. या धम्म परिषदेचे उद्घाटक म्हणून पुज्य भिक्खू थेर इम चांग व्वू (मुख्य संस्थापक, बुलम्वांगडोंगजोल विहार, दक्षिण कोरिया) तर विशेष अतिथी म्हणून पुज्य भिक्खू डॉ.लि.ची.रान (माजी कुलगुरू, कोरियन बुध्दीस्ट विद्यापीठ, दक्षिण कोरिया), पुज्य भिक्खू महाविरो थेरो (काळेगाव अहमदपुर), पुज्य भिक्खू धम्मशील थेरो (शिवणी, बीड) आणि पुज्य भिक्खू पय्यावर्धन (हिंगोली) भंते मैत्रेय (छ संभाजी नगर) भन्ते मैत्रेय संबोधी(बार्शी) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कार प्राप्त स्मृतीशेष शंकरराव जगतकर नगरी, चांदापुर (परळी वै.) येथे ही धम्म परिषद आयोजित करण्यात आली होती. या धम्म परिषदेचे सम्यक संकल्प या पेजवरून फेसबुक लाईव्ह थेट प्रक्षेपण करण्यात आले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कार प्राप्त स्मृतीशेष शंकरराव जगतकर नगरी, चांदापुर (परळी वै.) येथे ही धम्म परिषद आयोजित करण्यात आली होती. मागील काही वर्षांपासून बौद्ध धम्म उपासकांसाठी नांवारूपास आलेले सुप्रसिद्ध तीर्थक्षेत्र तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण चांदापूर, जेतवन (ता.परळी, जि.बीड) यांच्या वतीने तालुक्यातील चोखामेळा सहकारी सोसायटी, वसंतनगर तांडा, मौजे चांदापूर, ता.परळी येथे रविवारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त स्मृतीशेष शंकरराव जगतकर नगरी येथे अकराव्या बौद्ध धम्म परिषदेची सुरूवात पंचरंगी धम्म ध्वजारोहणाने करण्यात आली.

या धम्म परीषदेच्या अध्यक्षस्थानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रबोधिनीचे अध्यक्ष ऍड.अनंतराव जगतकर हे होते. तर यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार संजय दौंड, माजी लेफ्टनंट कर्नल डॉ.एम.एच.कांबळे तर यावेळी नालंदा अकादमीचे अध्यक्ष चंद्रशेखर वडमारे, सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले, कृषी तज्ज्ञ डॉ.मधुकर खळगे, समाजभूषण आनंद वाघमारे, बौद्धाचार्य आनंद तुपसमुद्रे, मिलिंद नरबागे, श्रावण बनसोडे, महादेव बनसोडे, संग्राम गित्ते (सरपंच, चांदापुर), प्रशांत गित्ते (ग्रा.पं.सदस्य,चांदापूर.), उपमुख्याध्यापक विलास गायकवाड, गोल्ड मेडल प्राप्त वंदना राहुल सुरवसे, बौद्धाचार्य सचिन रणखांबे तसेच

प्रसिद्धीप्रमुख प्रा.बालाजी जगतकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या प्रसंगी धम्म देसना देताना पुज्य भिक्खू माजी कुलगुरू डॉ.लि.ची.रान म्हणाले की, चांदापूर हा परिसर नैसर्गिक आहे. मेडिटेशन करण्यासाठी उत्तम ठिकाण आहे. येथील ध्यान केंद्राचा सर्वांना फायदा होईल. संबोधी, निर्वाण प्राप्त करण्यासाठी अशीच जागा लागते. भारत ही बुद्धभूमी आहे. सम्राट अशोक यांनी भारतासह जगात बुध्द धम्म रूजविला. तर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बुध्द धम्माचे पुनरूज्जीवन केले. त्यामुळे बाबासाहेबांच्या विचारांची जगाला गरज आहे. भारतात जीवंत बुध्दीझम पहावयास मिळतो असे गौरवोद्गार पुज्य भिक्खू डॉ.रान यांनी काढले. तर पुज्य भदन्त डॉ.उपगुप्त महाथेरो यांनी आपण शुध्द झाले पाहिजे, भिक्खू तयार करणे, ज्ञानी माणसं तयार करणे हा या धम्म परिषदेचा मुख्य उद्देश आहे. बाबासाहेबांनी आपल्याला दिलेले संविधान वाचविण्यासाठी आपण सामुहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे असे पुज्य भदन्त डॉ.महाथेरो म्हणाले. तर पुज्य भिक्खू पय्यावर्धन (हिंगोली) यांनी धम्म मनाची मशागत करतो, त्यामुळे धम्म पुढील पिढीला देण्यासाठी अशा धम्म परिषदा आवश्यक आहेत असे पुज्य भिक्खू पय्यावर्धन म्हणाले. तर यावेळी पुज्य भदन्त महाविरो म्हणाले की, बुध्द धम्म हा सदाचार शिकवतो, त्यामुळे सुखाच्या प्राप्तीसाठी धम्माची वाट चालावी लागेल, धम्माचा अंतिम उद्देश समजून घ्या, आधुनिक समाजात सदाचार व दुराचार यांचे युद्ध सुरू आहे. मानवाने चिंतन व मनन करावे, चिवर आणि भिक्षापात्र ही धनसंपत्ती सर्वश्रेष्ठ आहे. असे सांगून पुज्य भदन्त महाविरो यांनी कुशल कर्म, त्रिशरण, पंचशील, अष्टांग मार्ग, दहा पारमिता, कर्मवाद, धम्म संस्कार, दानाचे महत्व विषद केले. यावेळी पुज्य भिक्खू धम्मशील थेरो यांनी धम्म परिषदस उपस्थित उपासक, उपासिका यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी माजी आमदार दौंड यांनी मौजे चांदापुर (तिर्थक्षेत्र दर्जा - क प्राप्त) यांना आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले. प्रारंभी डॉ.राजेश इंगोले, डॉ.मधुकर कांबळे, प्रा.डॉ.मधुकर खळगे यांनी आपले विचार व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप ऍड.अनंतराव जगतकर यांनी केला. प्रास्ताविक राजेंद्र घोडके यांनी केले. तर सुत्रसंचालन जगन सरवदे, सचिन रणखांबे यांनी करून उपस्थितांचे आभार राहुल सुरवसे यांनी मानले. धम्म परिषदेच्या ठिकाणी परळी ग्रामीण पोलीस यांचे सुरक्षा पथक उपलब्ध करून देण्यात आले होते. या धम्म परिषदेत महत्वपुर्ण ठराव मांडण्यात येवून ते पारित करण्यात आले. हे ठराव केंद्र व राज्य शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याचे यावेळी जाहिर करण्यात आले. ठरावांचे वाचन प्रा.गौतम गायकवाड यांनी केले. धम्म उपासक हे पांढरे वस्त्र परिधान करून धम्म परिषदेत सहभागी झाले होते. धम्म परीषदेच्या पार्श्वभूमीवर रमाई चौक, कबीरनगर, अंबाजोगाई, जवळगाव, पुस, घाटनांदूर, उजनी, पट्टीवडगाव, नागापूर मांडवा (प), डाबी, या गावांतून धम्म रॅली काढण्यात आली, धम्म परिषदेच्या यशस्वितेसाठी तीर्थक्षेत्र तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण चांदापूर, जेतवन (ता.परळी वै. जि.बीड) चे पदाधिकारी धम्म परिषदेच्या यशस्वितेसाठी तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण चांदापूर, जेतवन (ता.परळी वै.जि.बीड) चे पदाधिकारी चंद्रकांत इंगळे, प्रा.प्रदीप रोडे, राजेंद्र घोडके, राहुल घोडके, प्रा.गौतम गायकवाड, व्यंकट वाघमारे, सचिन वाघमारे, जगन सरवदे, विश्वनाथ भालेराव, सीमाताई इंगळे तसेच चंद्रकांत बनसोडे, शाहीर गौतम सरवदे, सुरेश कांबळे, किशोर इंगळे, आकाश वेडे, सुशिल इंगळे, नागेश जोंधळे, राहुल सुरवसे, बी.एस.बनसोडे आदींनी पुढाकार घेतला होता.

बीड : भारतरत्न राजीव गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल काळे, यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना शाळेतील सर्व शिक्षक वृंद , मोरे सर ,उंबरे सर , तुपे सर श्री चलवदे सर , लवहराळे सर , श्रीमती सावंत मॅडम , डीगे सर , दुबे आर सी व इतर कर्मचारी उपस्थित होते.

घाटसावळी, नाळवंडी, शिवणी, नाथापुर सबस्टेशनमधून कमी दाबाने वीजपुरवठा, शेतकरी प्रचंड त्रस्त -धनंजय गुंदेकर

कुणीही लोकप्रतिनिधी आवाज उठवत नसल्याने हा जाणीवपूर्वक अन्याय, लवकरच तीव्र आंदोलन

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील २२० केव्ही बीड उपकेंद्रातून निघणारी ३३ केव्ही वीज वाहिनी सध्या प्रचंड ओव्हरलोड झाली आहे. सदर ३३ केव्ही लाईनवर मोठ्या प्रमाणात भार असून, पाच सबस्टेशन्स (३३/११ केव्ही शिवणी, नाळवंडी, घाटसावळी, खडकी देवळा, नाथापूर) आणि ६ औद्योगिक कंपन्या जोडलेल्या आहेत. त्यामुळे या लाईनवर अत्याधिक ताण येऊन वारंवार ट्रिपिंग, कमी दाबाचा (लो व्होल्टेज) वीजपुरवठा तसेच अनियमितता यांसारख्या गंभीर समस्या निर्माण झाल्या असल्याचे संचालक धनंजय गुंदेकर यांनी म्हंटले आहे.

याबाबत कुणीही आवाज उठवत नसल्याने महावितरण कडून दुर्लक्ष होत असून आठवडाभर झाले शेतकरी, नागरिक यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा

लागत आहे. शेती पंपांना योग्य दाबाने वीज मिळत नसल्यामुळे सिंचनावर विपरीत परिणाम होत आहे. पिके कोमेजून जात असून घरगुती वीज वापर देखील प्रभावित झालेला आहे. याच भागात विद्युत पुरवठा बाबत सातत्याने अन्याय होतो, या सब स्टेशन मधील समस्यांसाठी कोणताच लोकप्रतिनिधी पुढे येत नसल्याने येथील शेतकरी, ग्रामस्थांना विजेच्या बाबतीत नाहक समस्यांचा सामना करावा लागत असून याकडे महावितरण कंपनी प्रशासन सातत्याने दुर्लक्ष करते आहे म्हणून येत्या २ दिवसांत शेतकऱ्यांच्या बैठका घेत तीव्र आंदोलन उभा करण्यात येणार असल्याचा इशारा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक धनंजय गुंदेकर यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिला आहे.

आदित्य कृषी महाविद्यालयाचा रूपेश कापूरकरची कृषी अधिकारीपदी निवड

यशस्वी विद्यार्थी घडवणे हेच आदित्य शिक्षण संस्थेचे ध्येय-डॉ. आदित्य

बीड । प्रतिनिधी

आदित्य शिक्षण संस्थेतून पदवी घेऊन बाहेर पडलेला विद्यार्थी यशस्वी होतोच याचे समाधान वाटते. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा. त्यांच्या कला गुणांना वाव मिळावा. यासाठी महाविद्यालयात विविध स्पर्धा, तज्ज्ञांचे व्याख्यान, स्पर्धा परिक्षेची तयारी वेगवेगळे डे निमित्त विविध कार्यक्रम घेऊन पुस्तकी ज्ञानाबरोबर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास कसा होईल याकडे भर दिला जात असल्याने आज गोरगरिबांचे मुल शिक्षण घेऊन शासकीय नौकरी, विविध संस्थेत अधिकारी होतात याचे समाधान आहे. यशस्वी विद्यार्थी घडवणे हे संस्थेचे ध्येय असल्याचे प्रतिपादन आदित्य शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. आदित्य सारडा यांनी केले.

आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा विद्यार्थी रुपेश कापूरकर याची क्षेत्रीय ग्रामीण बँक मध्ये कृषी अधिकारी पदी निवड झाली. या निवडीबद्दल रूपेश याला शुभेच्छा देताना संस्थेचे संचालक डॉ.आदित्य सारडा बोलत होते. आयबीपीएस मार्फत क्षेत्रीय ग्रामीण बँक मध्ये विविध पदावर नियुक्ती बाबत राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आलेल्या परीक्षेतून पात्र उमेदवारांची निवड केली जाते. त्यामध्ये आदित्य कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचा रुपेश कापूरकर क्षत्रिय ग्रामीण बँक मध्ये कृषि अधिकारी - या पदासाठी पात्र ठरला आहे. रूपेशने २०१४ ते २०१८ या काळात आदित्य कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात . ( ) पदवी पूर्ण केली. या परीक्षेत यश मिळवल्या बद्दल संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा महाविद्यालयाचे प्राचार्य कल्याण आपेट,प्राचार्य अमोल सानप, प्राचार्य शाम भुतडा, प्राचार्य सतीश कचरे यांनी अभिनंदन केले.

रूपेश कापूरकर राज्यस्थानमध्ये करणार सेवा आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थी महाराष्ट्रासह परराज्यात आणि विदेशातील नामवंत संस्थेत मोठ-मोठ्या पदावर कार्यरत आहेत. रूपेश कापूर हा देखील क्षेत्रीय बँक अधिकारी म्हणून आता राजस्थान राज्यातील अजमेर येथे सेवा करणार आहे.

बांधकाम कामगार संघटनेचे पब्लिक पोर्टल सुरू

माजलगाव । प्रतिनिधी

बांधकाम मजुरांसाठी बंद करण्यात आलेले कामगार संघटनेचे पब्लिक पोर्टल सुरू करण्यात आले आहे. महाराष्ट्र असंघटित बांधकाम कामगार कृती समितीच्या शासनाकडे करण्यात आलेल्या मागणीला यश असल्याची माहिती कृती समितीचे अध्यक्ष शेख सादेक यांनी दिली.

महाराष्ट्र राज्यात बांधकाम मजुरांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे शासनाकडून बांधकाम मजुरांसाठी २८ कलमी योजना राबवल्या जातात.महाराष्ट्र असंघटित कामगार कृती समितीमार्फत संपूर्ण राज्यात बांधकाम मजुराच्या सोयीसाठी काम केल्या जाते.संघटनेमार्फत सुरू असलेल्या पब्लिक पोर्टलद्वारे

बांधकाम मजुरांसाठी शासनाच्या बहुमूल्य योजना आहेत.त्यात पाल्यांना शिष्यवृत्ती,किचन किट, पेठी साहित्य,मजुरांच्या एका मुलीच्या विवाहासाठी ५१ हजार रुपये दिले जातात.गंभीर आजाराच्या उपचारासाठी मदत, कामगाराचा अपघाती मृत्यू झाल्यास पाच लाख रुपये दिले जातात.अशा अनेक विविध योजनांचा लाभ शासनाकडून बांधकाम मजुरांना दिला जातो.

परंतु विधानसभेच्या आचारसंहितेत

राज्य शासनाने बांधकाम मजुरांच्या सोयीचे पब्लिक पोर्टल बंद केले होते.त्यामुळे बांधकाम मजुरांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते.यासाठी महाराष्ट्र असंघटित बांधकाम कामगार कृती समितीने अनेक आंदोलने केली.या आंदोलनाची दखल घेत शासनाने ४ फेब्रुवारी २०२५ रोजी शासन आदेश काढून सदरील पोर्टल सुरू केले आहे.अशी माहिती कृती समितीचे अध्यक्ष शेख सादेक यांनी दिली.दरम्यान हे यश महाराष्ट्र असंघटित बांधकाम कामगार समितीचे मानल्या जाते.यावेळी कृती समितीचे सचिव अजहर सिद्दिकी,दीपक चौगुले,प्रमिलाताई माळी,अशोक घेणे,मंगेश जोगदंड,

समीर शेख,अल्ताफ शेख, राजू शेख,सिकंदर शेख,इत्यादींनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

आयएसओ मानांकित प्रा.शाळा नफरवाडीची शैक्षणिक सहल संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्यातील नफरवाडी गावच्या आय एस ओ मानांकित जि.प.प्रा.शाळेची शैक्षणिक सहल नुकतीच संपन्न झाली.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी त्यांना शालेय पुस्तकी अनुभवाबरोबरच प्रत्यक्ष अनुभव मिळण्यासाठी,महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा असणाऱ्या वास्तू, नैसर्गिक ठिकाणे याबद्दलची प्रत्यक्ष माहिती मिळवण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असणारे शाळेचे मुख्याध्यापक आण्णासाहेब खंडागळे सरांच्या तसेच जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी बोंदार्डे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्व स्टाफच्या नियोजनाने या सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

सविस्तर माहिती अशी की ही सहल दिनांक २६ जानेवारी ते ३१ जानेवारी या कालावधीत संपन्न झाली.

ही सहल पाटोदा-पंढरपूर(पांडुरंग दर्शन)-नरसोबाची वाडी-(दत्त मंदिर,पंचगंगा आणि कृष्णा नदी संगम)कोल्हापूर-शाहू पॅलेस-कणेरी मठ (बोटॅनिकल गार्डन,म्युझियम, ग्रामजीवन खेडे,आरसेमहाल, भूतबंगला)-महालक्ष्मी मंदिर-रंकाळा तलाव-ज्योतिबा-पन्हाळा (तिनदारवाजा,अंधार बाव,काली बुरुज,अंबरखाना धान्याचे कोठार,बाजीप्रभू देशपांडे यांचा पुतळा,बालेकिल्ला,शिवा काशीद स्मारक-नानिज-रत्नागिरी- रत्नदुर्ग-मत्सालय- गणपतीपुळे(गणपती मंदिर,अरबी समुद्र)-रायगड(महादरवाजा, हत्ती तलाव,चोरदिंडी,गंगासागर तलाव,स्तंभ,मेणा दरवाजा,सिंहासन राजदरबार,राजसभा,नगारखाना,बाजारपेठ, राणी महाल,जगदीश्वर मंदिर,सेवेची ठायी तत्पर हिरोजी इंदुलकर यांच्याविषयीचा शिलालेख, महाराजांची समाधी,टकमक टोक,हिरकणी बुरुज,पाचाड जिजाऊ माँसाहेब यांचा वाडा आणि समाधी) -महाड चवदार तळे-प्रतापगड(छत्रपती शिवाजी महाराज अफजलखान भेटीचे ठिकाण-महाबळेश्वर (पाच नद्यांचा उगम,थंड हवेचे ठिकाण,इको पॉइंट सावित्री पॉइंट

अर्थर सीट पॉइंट,हंटर पॉइंट) -भिलार (पुस्तकांचे गाव)-मांढरदेवी-प्रतिबालजी सासवड-जेजुरी-मोरगाव-बारामती मार्गे प्रवास करत पाटोदा येथे आली. या सहलीत विद्यार्थ्यांना ऐतिहासिक वारसा लाभलेल्या वास्तू तसेच स्थळांची प्रत्यक्ष अनुभुती मिळाली. याचा अमूल्य असा फायदा त्यांना इतिहास व भूगोल विषय अभ्यासताना होणार आहे. सदरील सहलीत विद्यार्थी व शिक्षकांनी वेगवेगळ्या धार्मिक,ऐतिहासिक ठिकाणांना भेटी दिल्या. रायगड, प्रतापगड आणि पन्हाळा किल्ल्याला भेट देऊन छत्रपती शिवरायांचा इतिहास विद्यार्थ्यांनी समजून घेतला.सदरील ठिकाणांची ऐतिहासिक व धार्मिक पार्श्वभूमी समजून घेतली. या शैक्षणिक सहलीमध्ये ४९ विद्यार्थी सहभागी झाले होते.पाटोदा आगाराची बस घेण्यात आली होती. यामध्ये बसचालक प्रकाश सानप यांच्या सहकार्याने उत्तम प्रवास झाला.शैक्षणिक सहल यशस्वी करण्यासाठी नफरवाडी शाळेचे मु.अ.श्री. खंडागळे सर,नफरवाडी शाळेतील जेष्ठ व अनुभवी शिक्षक मुरूमकर सर,श्री राऊत सर,श्रीम.काकडे मॅडम,श्रीम.कदम मॅडम,श्रीम.,श्रीम वावरे मॅडम आदींनी परिश्रम घेतले. नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या या शाळेचे मुख्याध्यापक आण्णासाहेब खंडागळे सर व सर्व नफरवाडी शिक्षकवृंद यांचे नफरवाडी शा.व्य.समिती अध्यक्ष उत्तरेश्वर औटे,उपाध्यक्ष ,सर्व सदस्य तसेच गावचे सरपंच विद्याताई सवासे,उपसरपंच शितलताई तांबे,ग्रा.पं सदस्य आणि पाटोदा गटशिक्षणाधिकारी पिकवणे साहेब, जेष्ठ शिक्षणविस्ताराधिकारी बोंदार्डे साहेब यांनी तोंडभरून कौतुक केले आहे. सहलीचा मुख्य उद्देश मुलांना शाळेच्या चार भिंतीबाहेरील खरे जग दाखवणे. त्यांना जगाची खरी ओळख करून देण्याचा प्रयत्न करणे, महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा असणाऱ्या वास्तू, नैसर्गिक, भौगोलिक, धार्मिक ठिकाणांची माहिती मिळवणे हा असतो आणि हा उद्देश आम्ही आयोजित केलेल्या सहलीमधून नक्कीच साध्य होणार आहे

पान ६ वरून...

मनुष्य जीवनात साधूसंतांच्या

घुगे, पत्रकार विनोद पौळ, आबासाहेब शेंबडे , रामबप्पा लेंडगुळे, बंडू बावचकर यांच्यासह संत-महंत व विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच महिला व पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना दत्ता महाराज म्हणाले की, संत हे समाजाच्या कल्याणासाठी काम करतात म्हणून परमार्थात मन लावून संतांच्या चरणाशी रहा. तसेच जीवनात मिळालेल्या संपत्तीचा सत्कार्यासाठी उपयोग करा.साधूचे देव ऐकतो. साधू धर्माचे पालन करतात. श्री क्षेत्र गोरक्षनाथगड हे परिसराचे वैभव आहे. नाथ परंपरेची जो सेवा करतो त्यास कशाचीही कमतरता भासत नाही. वै.वामन महाराज हे थोर महान तपस्वी पुरुष होते. ते समाजासाठी शेवटपर्यंत झिजले त्यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी होते. त्यांच्या आशीर्वादाने गोरक्षनाथगडाची महती दिवसेंदिवस वाढत आहे. संताचे मन विशाल असते, त्यांच्याशी स्नेह राहू द्या परमार्थात मन स्थिर राहते. संताच्या आधाराने जगणे सुंदर करता येते देवाची संगत धरून चालत रहा. तसेच प्रत्येकाने ज्ञानेश्वरीचे वाचन करा तुळशीला पाणी घाला आईवडिलांची सेवा करा असा मौलिक सल्लाही त्यांनी शेवटी बोलताना दिला. यावेळी पंचक्रोशी परिसरातील सुप्रसिद्ध गायक, वादक, मृदंगाचार्य तसेच दिनानाथ गुरुकुल वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थी यांची साथ-संगत लाभली. कीर्तनानंतर उपस्थित हाजारो भाविकांना कवडगाव येथील जगन्नाथ सुखराम भोसले यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी सांगता सोहळ्यास महिला व पुरुष भाविकांचा अक्षरक्षा: जनसागर उसळला होता.

लसणाच्या दरात घसरण; डाळिंब, कापूस, ज्वारी आणि सोयाबीनचे दर काय?

राज्यात कापूस उत्पादन शेतकरी उत्पादन खर्चही वसूल होत नसल्यामुळे मेटाकुटीला आला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातही कापसाच्या भावात चढ उतार सुरू आहेत. तर तर राज्यातील बाजारात कापसाला आज ७ हजार ते ७ हजार ४०० च्या दरम्यान दर मिळाला आहे. आज अमरावती बाजारात दुपारपर्यंत ९० क्विंटल झाली. तर देऊळगाव बाजारात ८०० क्विंटल आणि नारखेड बाजारात १०६ क्विंटल आवाक झाली. फेब्रुवारीच्या शेवटी कापूस बाजारात आवक काहीशी कमी होईल, असा अंदाज कापूस बाजारातील अभ्यासकांनी वर्तवला आहे.

सोयाबीनचे दर राज्यातील बाजारात ३ हजार ९०० ते ४ हजारच्या दरम्यान आहेत. त्यामुळे सोयाबीन उत्पादक नाराज आहेत. आज दुपारपर्यंत सोयाबीनची सर्वाधिक १६ हजार १२ क्विंटल आवक लातूर बाजारात झाली. त्या खालोखाल कारंजा बाजारात ५ हजार क्विंटल सोयाबीनची आवक झाली. सोयाबीनचे दर हमीभावापेक्षा ८०० ते ९०० रूपयांनी कमी आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसत आहे. सोयाबीन भाव आणखी काही दिवस दबावात राहू शकतात, अशी शक्यता बाजार अभ्यासकांनी व्यक्त केली आहे.

राज्यात मृग बहारातील डाळिंब विक्री शेवटच्या टप्प्यात आली आहे. बाजारातील आवकही कमी झाली आहे. राज्यातील बाजारात आज दुपारपर्यंत डाळिंबाला १० हजार ते १३ हजार ५०० दरम्यान भाव मिळाला. यंदाच्या हंगामात डाळिंबाला काहीसा चांगला दर मिळाला. परंतु किडरोगांच्या प्रादुर्भावाने उत्पादनात घट आली. आज मुंबईतील बाजारात सर्वाधिक ९४४ क्विंटलची आवक झाली. तर छत्रपती संभाजीनगर, अमरावती, पुणे, सांगोला, सांगली नागपूर बाजारात आवाक घटली आहे. तसेच पुढील काळातही दर टिकून राहतील असा अंदाज जाणकारांनी व्यक्त केला आहे.

ज्वारीची आवक बाजारात कमीच आहे. राज्यातील बाजारात ज्वारीला आज १ हजार ७९५ ते २ हजार १२२ रुपये प्रति क्विंटलचा दर मिळाला. रब्बी ज्वारीच्या काढणीचा हंगाम तोंडावर आला आहे. परंतु बाजारात दर कमीच आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होण्याची शक्यता आहे. मागील महिन्याभरापासून ज्वारीची आवक कमी आहे. तर दरही दबावात आहेत. फेब्रुवारीच्या सुरुवातीलाच उष्णतेच्या झळा तीव्र झाल्याने ज्वारी पिकावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसण्याची शक्यता जाणकार व्यक्त करत आहेत.

राज्यातील बाजारात नव्या हंगामातील लसणाची आवक सुरू झाली आहे. नवीन आवकेमुळे दरात घसरण झाली. लसणाला सध्या ७ हजार ७५० ते १० हजार रुपये प्रतिक्विंटलच्या दरम्यान दर मिळत आहे. मागील दोन महिन्यांपूर्वी आवक कमी असताना लसणाच्या दरात तेजी होती. परंतु आता मात्र नवीन आवक सुरू होताच लसणाच्या दरात घसरण सुरू झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. आज दुपारपर्यंत नागपूर बाजारात सर्वाधिक १ हजार ६८० क्विंटलची आवक झाली. तर अकोला बाजारात दुपारपर्यंत सर्वाधिक भाव प्रतिक्विंटल १० हजार रुपयांचा मिळाला. लसणाच्या दरातील घसरणीने शेतकऱ्यांना मात्र मोठा फटका बसत आहे.

मृग बहार डाळिंबाचे फळवाढ आणि पक्वता अवस्थेतील व्यवस्थापन

फळबागेतून पाण्याचा संपूर्ण निचरा करावा. पावसामुळे झाडांच्या मुळांच्या जवळ पाणी साचलेले नाही, याची काळजी घ्यावी. पाणी साचून राहिल्यामुळे मर रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. फळांनी भरलेल्या फांद्यांना आधार देण्यासाठी योग्य प्रकारे स्टेकिंग किंवा काठीचा आधार करावा.

फळांची योग्य वाढ होण्यासाठी व चांगले वजन मिळवण्यासाठी गुच्छामधील जास्त आणि गरजेपेक्षा अधिक फळे काढावीत. पाच वर्षाच्या झाडासाठी प्रति झाड सुमारे ८० ते १०० फळे घ्यावीत. जास्त आर्द्रतेमुळे फळे गळण्याची समस्या उद्भवू शकते. तसेच फळांची परिपक्वता होण्यासाठी आणि चांगला रंग येण्यास थोडा विलंब होऊ शकतो म्हणून पाण्याचे योग्य व्यवस्थापन करावे. लवकर मृग बहार घेतलेल्या बागेमध्ये फळ पूर्ण पक्व होऊन सालीचा व दाण्यांचा रंग विकसित झाला असल्यास, फळगळ आणि बुरशीचे डाग टाळण्यासाठी वेळेत फळ तोडणी करावी.

अन्नद्रव्य व्यवस्थापन : सध्याच्या अवस्थेत डाळिंब बागेत खालीलप्रमाणे अन्नद्रव्य व्यवस्थापन करावे. ०-५२-३४ (मोनो पोटॅशियम फॉस्फेट) ६ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून १५-२० दिवसांचा अंतराने तीन फवारण्या कराव्यात. ६ ग्रॅम मॅंगनीज सल्फेट प्रति लिटर पाण्यात मिसळून १०-१५ दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. ०-५२-३४ (मोनो पोटॅशियम फॉस्फेट) ५.१२ किलो, यूरिया १२.५६ किलो आणि ०-०-५० (पोटॅशियम सल्फेट) ४.६ किलो प्रति एकर याप्रमाणे आठवड्याच्या अंतराने दहा वेळा ड्रीपद्वारे द्यावे.

संरक्षक पिके लावा आणि हानिकारक कीटकांपासून मुख्य पिकांना वाचवा

पिकांवरील कीटकांच्या समस्येमुळे शेतकरी अनेकदा चिंतेत असतात, ज्यासाठी शेतकरी अनेक प्रकारच्या खतांचा वापर करतात, परंतु यामुळे पिकांचे, शेतांचे आणि जमिनीचे नुकसान होते.

पण आपल्या निसर्गात अशी काही झाडे आहेत जी निसर्गासोबतच पर्यावरणही सुरक्षित ठेवतात. हे लक्षात घेता, पिकाला हानी पोहोचवणाऱ्या किडींपासून वाचवण्यासाठी शेतकरी संरक्षक पीक घेऊ शकतात. या संरक्षक पिकांचे वैशिष्ट्य म्हणजे ते मुख्य पिकाच्या मध्यभागी किंवा बाजूच्या पिकांच्या पेरणीबरोबर किंवा काही काळानंतर पेरले जातात. त्यांचे मुख्य कार्य हे आहे की जेव्हा मुख्य पिकामध्ये हानिकारक कीटक असतात तेव्हा रक्षक पिके कीटकांना आकर्षित करून मुख्य पिकाचे नुकसान थांबवतात आणि काही प्रमाणात संरक्षणात्मक पिकांसह कीड नियंत्रण शक्य नसल्यास लवकरात लवकर इतर रासायनिक पद्धतीचा वापर करावा. कीटकांना आकर्षित करणारी पारंपारिक पिके मुख्य पिकाच्या बरोबर किंवा पुढे लावावीत जेणेकरून रक्षक पिके सर्वात जास्त आकर्षित होतील.

संरक्षक पिकांचा वापर कसा करावा?

१) वांग्यांचे स्टेम बोअरर आणि फ्रूट बोअररपासून संरक्षण करण्यासाठी, वांग्याच्या २ किंवा ३ ओळींनंतर एका ओळीत मेथी किंवा कोथिंबीर लावा.

२) कापसावरील पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी चवळीची लागवड कापसाच्या ४ ओळींनंतर किंवा तंबाखूची २० ओळींनंतर २ ओळीत केली जाते. ३) टोमॅटोमध्ये फळाची बोअर आणि निमॅटोड टाळण्यासाठी झेंडूच्या फुलाची (आफ्रिकन प्रजाती) टोमॅटोच्या १०-१४ ओळींनंतर सलग लागवड करावी. ४) कोबी पिकावरील किडीपासून संरक्षण करण्यासाठी कोबीच्या २२-२४ ओळींनंतर २ ओळी मोहरीच्या टाकाव्यात. ५) हरभऱ्यामधील शेंगा पोखरणाऱ्या किडीच्या नियंत्रणासाठी कोथिंबीर किंवा झेंडूची रोपे हरभऱ्याच्या ४ ओळींनंतर लावावे.

इतर माहिती : १) शेतकरी बांधवांनो, जर तुम्ही कीड नियंत्रणासाठी संरक्षक पिके लावत असाल, तर नियमितपणे कीड आणि पिकांचे निरीक्षण करा. २)संरक्षित पिकांद्वारे कीड नियंत्रण शक्य नसेल तर तज्ज्ञांच्या मते रासायनिक पद्धतींचा वापर करावा अन्यथा पिकाच्या उत्पादनात घट होईल.

उसाच्या पाचटापासून मिळवा उत्तम सेंद्रिय खत

ऊस तोडणीनंतर उसाचे पाचट जाळून टाकण्याकडे शेतकऱ्यांचा कल असतो. त्यामुळे नायट्रोजन, कार्बन आणि गंधक हे अन्नघटक वाया जातात. शिवाय जमीन भाजली गेल्याने जमिनीतील उपयुक्त जिवाणूंचा नाश होतो पाचट जाळण्याची मानसिकता बदलून पाचटापासून सेंद्रिय खत तयार केल्यास त्यातून खताची उपलब्धता होऊ शकते वाढत्या महागाई सोबत ऊस उत्पादन खर्चात वाढ होत आहे. रासायनिक खतांचा असंतुलित पद्धतीने वापर केला जातो. त्यातून ऊस पिकाखालील क्षेत्र क्षारपड होण्याचा धोका आहे उसापासून दर हेक्टरी ७ ते ८ टन पाचट उपलब्ध होते. या पाचटाचे सेंद्रिय खत बनविणे हा चांगला पर्याय आहे.

पाचट चिवट असल्याने ते लवकर कुजत नाही. त्याचे लवकर विघटन करण्यासाठी जिवाणूंचा वापर करावा लागतो. त्यासाठी पाचटाचे लहान लहान तुकडे करावेत. पाचटाचे लवकर विघटन होण्यासाठी शेण, माती व पाणी यांचा वापर करावा. पाचटात सेंद्रिय कर्ब प्रमाण जास्त (४५ टक्के) व नत्र कमी (०.३५ टक्के) असल्याने कर्ब नत्र प्रमाण जास्त असते. त्यामुळे पाचटाचे लवकर विघटन होण्यासाठी नत्रपुरवठा युरियामार्फत करावा लागतो.

पाचट खतामधील नत्र प्रमाण कमी होऊ नये म्हणून सुपर फॉस्फेट वापरावे. अशा कंपोस्टमधील स्फुरदाची पिकास उपलब्धता वाढते.

पाचट कुजविण्याच्या विविध पद्धती

१) खड्डा पद्धत : ऊस पाचटाचे कंपोस्ट ढीग किंवा खड्डा पद्धतीने करता येते एक टन ऊस पाचटापासून कंपोस्ट करण्यासाठी ४ मीटर लांब, २ मीटर रुंद व १ मीटर खोल खड्डा तयार करावा. त्यात तुकडे केलेले पाचट २५ ते ३० सेंमी. जाडीच्या थराने भरावे. प्रत्येक थरावर पाचट ओले करून त्यावर जिवाणु मिश्रित शेणकाला शिंपडावा, तसेच युरिया, सुपर फॉस्फेट टाकावे. एक टन पाचटास १०० किलो शेणाचा काला वापरावा यासाठी शेणकाला करताना शेण व पाणी १:५ प्रमाणात वापरावे. सर्व थर भरून झाल्यावर पाचटाची वरील बाजू चिखलमातीने बंद करावी. साधारणपणे दीड ते दोन महिन्यांनी खड्डा उघडावा. थरामधील पाचट चांगले मिसळून घ्यावे. त्या वेळी थोडे पाणी शिंपावे व खड्डा पुन्हा चिखलमातीने बंद करावा. कंपोस्ट खतास तपकिरी काळसर रंग येतो व ते सहज कुस्करले जाते. ऊस पाचट खतामुळे शेणखताप्रमाणेच जमिनीची सुपिकता व पीक उत्पादकता वाढते.

२) ढीग पद्धत : ही पद्धत खड्डा पद्धतीसारखीच आहे. फक्त पाचट खड्ड्यात टाकून कुजवण्याऐवजी ढीग करून कुजवतात.

३) खोडवा उसात पाचट कुजविणे

शेतात जागेवरच कुजविल्यास खोडवा पिकास उपयुक्त ठरते. यासाठी ऊस तोडणी झाल्यावर राहिलेले पाचट कुट्टी करून एक सरी आड दाबून घ्यावे. साधारणतः एक एकर क्षेत्रासाठी १६ किलो युरिया व २० किलो सिंगल सुपर फॉस्फेटचे २०० लिटर पाण्यामध्ये केलेले द्रावण कीटकनाशकाच्या पंपाचा नोझल काढून सरीमधील पाचटावर फवारावे. यावर दोन किलो कंपोस्ट जिवाणू संवर्धन शेणकाल्यामधून एक एकर क्षेत्रावरील पाचटावर शिंपडून हलकेसे पाणी द्यावे.

पाचट थोडेसे दाबल्यानंतर रिजरच्या साह्याने बगला फोडून माती पाचटावर टाकल्यास पाचट जागेवर कुजते जमिनीची उत्पादकता कायम टिकविण्यासाठी जिवाणू खते व पीक फेरपालटीचा अवलंब करण्याबरोबरच सेंद्रिय खतांचा वापर करणे अत्यंत गरजेचे आहे.

महत्वाच्या घटना

१६६५ : शिवाजी महाराजांनी सूर्यग्रहणाच्या निमित्ताने राजमाता जिजाऊ व सोनोपंत विश्वनाथ डबीर यांची सुवर्णतुला केली. श्री क्षेत्र महाबळेश्वर येथील देवळासमोर ही सुवर्णतुला झाली.

१६७३ : कोंडाजी फर्जंद यांनी अवघ्या ६० मावळ्यांनिशी पन्हाळा जिंकुन महाराजांचे १३ वर्षे अपुर्ण असलेले स्वप्न पूर्ण केले.

१८३२ : पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी इंग्रजी व मराठीतील पहिले साप्ताहिक वृत्तपत्र 'दर्पण' सुरू केले.

१८३८ : सॅम्युअल मॉर्स यांनी तारयंत्राचा शोध लावला.

१९०७ : मारिया मॉंटेसरी यांनी पहिली मॉंटेसरी शाळा सुरूकेली. त्यांच्या शाळांमुळे पूर्वप्राथमिक शिक्षणात आमूलाग्र बदल झाला.

१९१२ : न्यू मेक्सिको हे अमेरिकेचे ४७ वे राज्य बनले.

१९२४ : राजकारणात भाग न घेणे व रत्नागिरी जिल्ह्यातच राहणे या अटींवर स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जन्मठेपेतुन सशर्त मुक्तता

१९२९ : गोरगरिब व रुग्णांची सेवा करण्यासाठी मदर तेरेसा यांचे कोलकाता येथे आगमन

१९४४ : दुसरे महायुद्ध रशियन सैन्य पोलंडमध्ये शिरले.

१९४६ : आजच्या दिवशी विएतनाम येथे पहिल्या सार्वत्रिक निवडणूका घेण्यात आल्या.

१९८९ : केहर सिंह आणि सतवंत सिंह यांना इंदिरा गांधींच्या हत्या करण्याच्या गुन्हात फाशीची शिक्षा देण्यात आली.

१९९४ : सिडनी टेस्ट सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या टीम ने ऑस्ट्रेलिया च्या टीम ला ५ रन नी हरविले.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४१२ : फ्रान्सला परकीय जोखडातून मुक्त करणार्या 'जोन ऑफ आर्क'चा जन्म. तिला चेटकीण ठरवून जाळण्यात आले. नंतर मात्र तिला संत ठरवले गेले. ती 'द मेड ऑफ ऑर्लिन्स' या टोपणनावानेही ओळखली जाते. (मृत्यू: ३० मे १४३१)

१७४५ : बलूनच्यासहाय्याने आकाशात उडण्याचे प्रयोग करणाऱ्या जाक्कास एलियन मॉंटगोल्फिएर यांचा जन्म.

१८१२ : बाळशास्त्री जांभेकर मराठी पत्रकारितेचे पितामह, १८३२ मधे 'दर्पण' हे वृत्तपत्र काढून त्यांनी वृत्तपत्र व्यवसायाचा पाया घातला. 'दिग्दर्शन' हे मराठीतील पहिले मासिकही त्यांनीच १८४० मधे सुरू केले. (मृत्यू: १८ मे १८४६)

१८२२ : उत्खनन करून ट्रॉय आणि मायसेनी या नगरीचा शोध लावणाऱ्या हेन्रीचा श्लीमन यांचा जन्म.

१८६८ : गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे उर्फ 'दासगणू महाराज' आधुनिक संतकवी, 'भक्तिरसामृत', 'भक्तकथामृत' आणि 'संतकथामृत' हे त्यांचे संतचरित्रात्मक ग्रंथ आहेत. (मृत्यू: २५ नोव्हेंबर १९६२)

१८८३ : खलील जिब्रान लेबनॉनमधे जन्मलेले अमेरिकन कवी, लेखक व कलाकार (मृत्यू: १० एप्रिल १९३१)

१९१० : ला प्रसिद्ध भारतीय गायक जी. एन. बालासुब्रमनियम यांचा जन्म.

१९१८ : ला भारतीय प्रसिद्ध गायक भारत व्यास यांचा जन्म.

१९२५ : रमेश मंत्री प्रवासवर्णनकार, कथाकार, विनोदी लेखक (मृत्यू: १९ जून १९९८)

१९२८ : नाटककार, चित्रपटकथालेखक, पत्रकार व साहित्यिक विजय तेंडुलकर यांचा जन्म. (मृत्यू: १९ मे २००८ पुणे, महाराष्ट्र)

१९३१ : डॉ. आर. डी. देशपांडे पर्यावरण क्षेत्रातील शा'स्त्रज्ञ, 'महाराष्ट्र असोसिएशन फॉर द कल्टिव्हेशन ऑफ सायन्स'चे (आघारकर रिसर्च इन्स्टिट्युट) अध्यक्ष

१९४० : प्रसिद्ध भारतीय लेखक नरेंद्र कोहली यांचा जन्म.

१९४९ : परमवीर चक्राने सन्मानित सुभेदार बाना सिंग यांचा जन्म.

१९५५ : रोवान ॲटकिन्सन विनोदी अभिनेते व पटकथालेखक

१९५९ : कपिल देव निखंज भारतीय क्रिकेटकप्तान, समालोचक व प्रशिक्षक

१९६५ : हिमाचल प्रदेश चे १४ वे मुख्यमंत्री जय राम ठाकूर यांचा जन्म.

१९६७ : ऑस्कर पुरस्कार विजेते जगप्रसिद्ध गायक ए. आर. रेहमान यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९६ : जिवबा दादा बक्षी महादजी शिंदे यांचे सेनापती, मुत्सद्दी (जन्म:)

१८४७ : त्यागराज दाक्षिणात्य संगीतकार (जन्म: ४ मे १७६७)

१८५२ : लुई ब्रेल अंधांना उपयोगी पडणाऱ्या ब्रेल लिपीचे जनक व शिक्षक (जन्म: ४ जानेवारी १८०९)

१८८४ : ग्रेगोर मेंडेल जनुकांची संकल्पना मांडणारा जर्मन जीवशास्त्रज्ञ (जन्म: २० जुलै १८२२)

१८८५ : भारतेंदू हरिश्चंद्र आधुनिक हिन्दी साहित्याचे जनक मानले जाणारे हिन्दी साहित्यिक, १८५० ते १९०० हा काळ हिन्दी साहित्यात 'भारतेंदू काळ' म्हणून ओळखला जातो. (जन्म: ९ सप्टेंबर १८५०)

१९१८ : जी. कँटर जर्मन गणितज्ञ (जन्म: ३ मार्च १८४५)

१९१९ : थिओडोर रुझव्हेल्ट अमेरिकेचे २६ वे राष्ट्राध्यक्ष, नोबेल पारितोषिक विजेते (जन्म: २७ आक्टोबर १८५८)

१९७१ : प्रफुल्लचंद्र तथा पी. सी. सरकार जादूगार (जन्म: २३ फेब्रुवारी १९१३)

१९८१ : ए. जे. क्रोनिन स्कॉटिश लेखक (जन्म: १९ जुलै १८९६)

१९८४ : 'विद्यानिधी' सिद्धेश्वरशास्त्री विष्णू चित्राव महामहोपाध्याय, वैदिक साहित्याचे अभ्यासक व मराठी कोशकार (जन्म: १ फेब्रुवारी १८८४)

२००८ : भारतीय ऑर्थोपेडिक सर्जन प्रमोद करन सेठी यांचे निधन.

२००९ : जम्मू काश्मीर चे माजी मुख्यमंत्री गुलाम मोहम्मद शाह यांचे निधन.

२०१० : प्रल्हाद ईरबाजी सोनकांबळे लेखक व इंग्रजीचे प्राध्यापक (जन्म: १६ जुलै १९४३)

२०१७ : भारतीय अभिनेता ओम पुरी यांचे निधन.

अनुदान, पिकविमा व कर्जमाफी कधी? शेती प्रश्नावर किसान सभेचा सवाल

बीड । प्रतिनिधी

शेती प्रश्नावर किसान सभेकडून जिल्हाधिकारी कार्यलयासमोर करण्यात आलेल्या निदर्शनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत किसान सभेच्या शिष्टमंडळाने अतिवृष्टी अनुदान, सोयाबीन कापूस सानुग्रह अनुदान व कर्जमाफी आदी प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेतली यावेळी यावेळी केवायसी केलेल्या शेतकऱ्यांना लवकरच त्यांच्या खात्यात अनुदान प्राप्त होईल व ज्यांची केवायसी होऊ शकलेली नाही, अथवा केवायसी च्या यादीत ज्यांचे नाव येऊ शकलेले नाही, आशां शेतकऱ्यांसाठी गाव स्तरावर लवकरच कॅम्पचे आयोजन करण्यात येईल व संबंधित शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यात येतील असे आश्वासन जिल्हा प्रशासनाने शिष्टमंडळाला दिले.शेती प्रश्नावर किसान सभेने दि २७ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालय समोर जोरदार निदर्शने आंदोलन केली या निदर्शनाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी मंगळवार दि ४ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती हॉलमध्ये सांयकाळी ५ वा. बैठक पार पडली. यावेळी

किसान सभेच्या शिष्टमंडळाने अतिवृष्टी अनुदान व सोयाबीन कापूस सानुग्रह अनुदान यापासून वंचित शेतकऱ्यांचा प्रश्न जिल्हा कृषी अधीक्षक यांच्यासमोर उपस्थित केला. यावेळी केवायसी केलेल्या शेतकऱ्यांना लवकरच त्यांच्या खात्यात अनुदान प्राप्त होईल व ज्यांची केवायसी होऊ शकलेली नाही, अथवा केवायसी च्या यादीत ज्यांचे नाव येऊ शकलेले नाही, आशां शेतकऱ्यांसाठी गाव स्तरावर लवकरच कॅम्पचे आयोजन करण्यात येईल व संबंधित शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यात येतील असे आश्वासित करण्यात आले.

यावर्षी पिके वाढीच्या विविध टप्प्यात अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले होते. त्या अनुषंगाने पिक विमा धारक शेतकऱ्यांनी आपल्या पीक नुकसानीच्या तक्रारी रीतसर पिक विमा कंपनीकडे केलेल्या आहेत. विमाप्रावधनानुसार ज्यावेळेस व्यापक नुकसान होऊन या नुकसानीच्या २५ टक्के पेक्षा जास्त तक्रारी पीकविमा कंपणीकडे दाखल होतात त्यावेळी तातडीचा दिलासा म्हणून २५% पीक विमा ॲग्रीम देणे कंपनीला बंधनकारक असते. मात्र अजूनही पिक विमा कंपनीने हे पैसे दिलेले नाहीत. शिवाय तक्रारी संदर्भात प्रक्रिया पूर्ण होऊन शेतकऱ्यांना संबंधित नुकसानाचे विम्याचे पैसे खात्यावर जमा होणे अपेक्षित असताना हे पैसे का मिळाले नाहीत? हा प्रश्न किसान सभेचे जिल्हाध्यक्ष अजय बुरांडे यांनी उपस्थित केला असता पिक विमा प्रतिनिधींनी आम्हाला शासनाकडून मिळणारा हप्ता आला नाही, त्यामुळे कंपनीने पैसे दिले नाहीत. ज्यावेळेस शासनाकडून पैसे येतील त्यावेळेस आम्ही शेतकऱ्यांना हे विम्याचे पैसे देऊ अशी भूमिका मांडली. यात जिल्हाधिकाऱ्यांनी हस्तक्षेपकरत शेतकऱ्यांनी कंपनीशी करार केलेला आहे, शेतकऱ्याचा विमा क्लेम जर मंजूर असेल तर विमा कंपनीने शेतकऱ्यांना पैसे देणे बंधनकारक आहे. यात उगाच आपण शासनाला बदनाम करू नये. जर आपली हीच भूमिका असेल तर आम्ही तुमच्यावर कारवाई करू असा दम भरला. एकंदर या पार्श्वभूमीवर पिक विमा मिळणे आणखी किती दिवस रखडणार हा प्रश्न शिष्टमंडळाने उपस्थित केला. त्यावर विमा कंपनीकडून समाधानकारक उत्तर मिळू शकले नाही. या प्रश्नी तीव्र संघर्ष अटळ असल्याची भूमिका किसानसभेने मांडली. किफायतशीर हमीभाव, कर्जमाफी व शक्तिपीठ महामार्ग स्थगिती हे धोरणात्मक मुद्दे असून आम्ही शासनपर्यंत आमच्यामार्फत आपल्या मागण्या पोहचवू असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. सोयाबीन खरेदीच्या मुद्द्यावर शासनाने ०६ फेब्रुवारी पर्यंत खरेदीस दिलेली मुदतवाढ पुरैशी नसल्याचे चर्चेतून निदर्शनास आले. बीड जिल्ह्यातील ४४ हजारापेक्षा जास्त शेतकऱ्यांनी सोयाबीन खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी केलेली आहे. नोंदणी केल्या पैकी १८ हजार शेतकऱ्यांचेच सोयाबीन मुदतीपर्यंत खरेदी होईल. म्हणून उर्वरित शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी होणे शक्य नसल्याचे पुढे आले. याला आणखी मुदत वाढीची आवश्यकता आहे. याशिवाय साठवणीसाठीचे वेअर हाऊस उपलब्ध नसणे, जिल्हा बाहेरील वेअर हाऊस पर्यंत पोहोचण्याचा वाहतूक खर्च, तेथील वाहन खाली होण्यासाठी होणारा वेळ, वाहन होल्डिंग चार्ज इत्यादी समस्या असल्याच्या बाबीही चर्चेतून समोर आल्या. सोयाबीन खरेदीचा प्रश्न गंभीर असल्याचे एकंदर निदर्शनास आले. एकतर सर्व सोयाबीन हमीभावाने खरेदी करा नसता बाजार भाव व हमीभाव यातील भावांतर शासनाने अनुदान देऊन पूर्ण करा. या पार्श्वभूमीवर किसान सभा आपला लढा आणखीन तीव्र करण्याची भूमिका किसान सभेच्या प्रतिनिधी मंडळांनी मांडली. शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करत असताना बँक प्रोसेसिंग फी च्या नावाखाली मोठी रक्कम वसूल करते याशिवाय इन्स्पेक्शन चार्ज व इतर चार्जेस च्या नावाखाली खात्यातून आपोआप रक्कम काढते यामुळे शेतकऱ्यांना नाहक बुर्दंड सोसावा लागत आहे. तो बंद झाला पाहिजे ही भूमिका मांडली यावर जिल्हाधिकाऱ्यांनी यातून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी लवकरच बँकांशी स्वतंत्र मीटिंग बोलवण्याचे आश्वासित केले. तसेच पीएम किसान, विविध अनुदाने व पिक विमा यांचे पैसे हे खाते होल्ड केल्यामुळे रोखले जाऊ शकत नाहीत असे नोटीस सुद्धा काढण्यार आसल्याचे सांगितले. या बैठकीसाठी बीड जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा कृषी अधीक्षक, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी, जिल्हा उपनिबंधक, जिल्हा मार्केटिंग अधिकारी व जिल्हा पिकविमा कंपनी प्रतिनिधी यांच्यासह किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ. अजय बुरांडे, कॉ. दत्ता डाके, कॉ. मुरलीधर नागरगोजे, कॉ भगवान बडे, कॉ. ब्रम्हानंद देशमुख, कॉ.बालाजी कडभाने, कॉ. सय्यद रजाक, खुर्शीदभाई, व जगन्नाथ घाळे, सिद्राम सोळंके हे शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते.

महानगरपालिका व पतंजली योग शिबीर ७ फेब्रुवारीपर्यंत राहणार

जालना। प्रतिनिधी

जालना शहर महानगरपालिका व पतंजली योग शिबीर समिती यांच्या संयुक्त विद्यमाने योग प्राणायाम शिबीर दि ७ फेब्रुवारी पर्यंत सकाळी ०६.०० ते ७.३० या वेळेत स्व. कल्याणराव घोगरे स्टेडियम या ठिकाणी केले जाणार आहे. सदरील शिबीरास आज दिनांक ०३.०२.२०२५ पासुन प्रारंभ सुरुवात झाली. यावेळी जालना मनपाचे आयुक्त तथा प्रशासक श्री. संतोष खांडेकर यांनी दिपप्रज्वलन केले. सदर शिबरामध्ये पतंजली योग समितीसह राज्य प्रभारी योग शिक्षक प्रल्हाद माऊली हरबक, माजी उपाध्यक्ष श्री. राजेश राउत, माजी नगरसेविका श्रीमती संध्या संजय देठे, अतिरिक्त आयुक्त श्रीमती प्रीयंका राजपुत, उपायुक्त नंदा गायकवाड, सहायक आयुक्त सुप्रीया चव्हाण, सहायक आयुक्त अपर्णा जाधव, कार्यालयीन अधिक्षक श्री. विजय फुलंब्रीकर, मालमत्ता विभाग प्रमुख श्री. राहुल देशमुख, स्वच्छता विभाग प्रमुख श्री. पंडीत पवार, अभियंता श्री. अशोक कटारे, लिपीक श्री. संजय भालेराव, श्री. मोहन जामदार, बंडु चव्हाण, अजय पेंबार्ती तसेच मनपातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी सदर शिबीरास पोलीस प्रशिक्षण केंद्र कार्यालय, जालनाचे प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. तरी जालना शहर महानगरपालिकातर्फे शहरातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, सदरील योग शिबीर उपस्थित राहुन शिबीराची शोभा वाढवावी.

संध्या आकाश जाधव या गोड गायक जोडीला कलाभूषण पुरस्कार जाहीर

बीड। प्रतिनिधी

गेल्या काही वर्षात गायन क्षेत्रामध्ये आपल्या गोड गायकीच्या माध्यमातून संध्या आणि आकाश हे जाधव दांपत्य अक्षरशः धुमाकूळ घालत असून त्यांच्या गायन कलेची बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात नोंद घेतली जात आहे. कुठेही चांगला कौटुंबिक कार्यक्रम असला की या गोड गळ्याच्या दाम्पत्यांना गीत संगीत रसिक आपल्या कार्यक्रमाला रंगतदार बनवण्यासाठी आवर्जून बोलावतात. यामुळे या दोघांच्या गायन कलेची ख्याती जवळपास महाराष्ट्र भर पसरली असल्याने माजलगाव तालुक्यातील निर्भीड पत्रकार संघाने या दाम्पत्याला कलाभूषण पुरस्कार जाहीर केले आहेत. यामुळे संध्या आणि आकाश या जाधव दांपत्यांवर समाजाच्या सर्व क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांनी यापुढेही गायन कलेला असेच समर्पित राहून बीड जिल्ह्याचे नाव फक्त महाराष्ट्रच नाही तर महाराष्ट्राबाहेर सुद्धा उंचवावे अशा सदिच्छा व्यक्त करून शुभेच्छा देण्यात येत आहे.निर्भीड पत्रकार संघ माजलगाव कडून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मूकनायक पुरस्कार तसेच कला, क्रीडा, साहित्य, उद्योग, समाजकार्य, आरोग्य सेवा अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा सन्मान अतिथी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन केला जातो. या वर्षीचा कलाभूषण पुरस्कार गायक तथा निवेदक आकाश जाधव (हे गायकीसह निवेदक म्हणून ही लक्षवेधी प्रस्तुती करीत आहेत) आणि त्यांच्या सौभाग्यवती गायिका संध्या जाधव यांना जाहीर करण्यात आला असून अतिथी मान्यवरांच्या हस्ते दिनांक ६ फेब्रुवारी २०२५ गुरुवार रोजी वैष्णवी मंगल कार्यालय माजलगाव येथे भव्यदिव्य कार्यक्रमात पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. कलाभूषण पुरस्कारासाठी गायन क्षेत्रातील या गोड जोडीची निवड निर्भीड पत्रकार संघ माजलगाव चे तालुकाध्यक्ष बाळासाहेब आडागळे यांनी केली आहे.

डॉ. सतीश साळुंके लिखित पाच नाटके अंतिम फेरीत

बीड। प्रतिनिधी

प्रसिद्ध नाटककार व दिग्दर्शक डॉ. सतीश साळुंके यांनी लिहिलेल्या विविध पाच नाटकांनी महाराष्ट्र शासनाच्या वतीने सांस्कृतिक संचालनालय आयोजित हौशी व बालनाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत जाण्याचा विक्रम केला. गतवर्षीही साळुंके यांची तीन बालनाट्य अंतिम फेरीत होती.

यावर्षी कोल्हापूर, सांगली केंद्रातून 'झाले मोकळे आभाळ', नागपूर केंद्रातून 'राखेत उडाला मोर' सोलापूर केंद्रातून 'बीज अंकुरले' संभाजीनगर-बीड-नांदेड केंद्रातूनही 'झाले मोकळे आभाळ' तर अकोला हौशी राज्य नाट्यकेंद्रातून 'अग्नीकाष्ठ' ही नाटके डॉ. साळुंके लिखित अव्वल ठरली असून ही सगळी नाटके आता रत्नागिरी येथे होत असलेल्या अंतिम फेरीत धडकणार आहेत. महाराष्ट्रच्या हौशी व बालरंगभूमीवरील प्रयोगशील व चिंतनशील नाटककार म्हणून साळुंके यांना ओळखले जाते. यापूर्वी 'काऊम्याऊ', 'प्रायश्चित्त', 'राखेतून उडाला मोर' ही त्यांची नाटके अंतिम फेरीत पहिली आली होती. शिवाय 'झाडवाली झुंबी' या नाटकालाही अंतिम फेरी तिसरा क्रमांक मिळाला होता. बालनाट्याची संकल्पना आणि नाटकाचे विषय यामध्ये मोठे परिवर्तन करून मराठी रंगभूमीवरील बालनाटकाला एक वेगळा आशय साळुंखे यांनी प्रदान केला. साळुंके यांची विविध चार नाटकांची पुस्तके ही प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. यापूर्वी त्यांची २२ पुस्तके प्रकाशित असून त्यात इतिहास, नाटक, बालनाट्य व एकांकिकासंग्रह अशा पुस्तकांचा समावेश आहे. महाराष्ट्र शासनाच्या साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फेही त्यांच्या अनेक पुस्तकांना पुरस्कार असून भारत सरकार तर्फे आदर्श शिक्षकाचा राष्ट्रपती पुरस्कारही त्यांना मिळाला. दरम्यान महाराष्ट्रभर माझ्या नाटकाला मिळालेले यश हे माझे नसून महाराष्ट्रभर माझे नाटक जीव लावून करणाऱ्या शेकडो कलावंत, दिग्दर्शक आणि नाट्य संस्थांचे असल्याची प्रतिक्रिया डॉ.सतीश साळुंके यांनी आमच्या प्रतिनिधी जवळ व्यक्त केली

शहरातील नगरोत्थान योजनेंतर्गत सिमेंट रस्त्यावरील खड्डे अपघाताला निमंत्रण

नगरविकास मंत्री, सचिवांना तक्रार:- डॉ.गणेश ढवळे

बीड। प्रतिनिधी

बीड शहरातील नगरोत्थान योजनेतुन पहिल्या टप्प्यात ७० कोटी आणि दुसऱ्या टप्यात ६९ कोटी अशी तब्बल १४९ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या सिमेंट रस्ते व नाली बांधकाम पैकी काही रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाली असुन माने काम्प्लेक्स ते यशवंतराव चव्हाण नाट्यगृह रोडवरील रस्त्याची वर्षभरातच दुरावस्था झाली. माय कॉम्प्लेक्स ते यशंतराव चव्हाण नाट्यगृह हा रस्ता मोठ्या रहदारीचा रस्ता आहे विविध व्यवसाय दुकाने क्लासेस दवाखाने या रस्त्यावर आहेत त्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात कायम वर्दळ या ठिकाणी असते. रस्त्याच्या मधोमध पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे याठिकाणी अपघाताच्या घटना घडलेल्या आहेत. अशा प्रकारची स्थिती अनेक ठिकाणी रस्त्यांवर आढळून येत आहे तर सिमेंट रस्त्यांची कामे करताना

रस्त्यांच्या मधोमध वाहतूकीस अडथळा व अपघाताला निमंत्रण ठरणारी रोहित्र व वीजेचे खांब हटविण्यात आले नाहीत.संबधित प्रकरणात कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर , शेख युनुस,रामनाथ खोड,शिवशर्मा शेलार, पांडुरंग हराळे , बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, बीड जिल्हाध्यक्ष आप माजी सैनिक अशोक येडे यांनी जिल्हाधिकारी बीड, मुख्याधिकारी नगरपालिका बीड यांच्या मार्फत उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे, सचिव नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांना लेखी निवेदनाद्वारे केली असुन दि.१० सोमवार रोजी त्याच खड्ड्यात ''बेशरमांची वृक्षलागवड'' करून लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा दिला आहे.

बीड शहरातील माने काम्प्लेक्स ते यशवंतराव चव्हाण नाट्यगृह दरम्यान वर्षभरापूर्वी तयार करण्यात आलेल्या नवीन सिमेंट रस्त्यांवर तडे आणि मोठमोठे खड्डे पडले असुन त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. माने कॉम्प्लेक्स ते यशवंतराव चव्हाण नाट्यगृह हा रस्ता मोठ्या रहदारीचा रस्ता आहे विविध व्यवसायिक दुकाने शाळांचे क्लासेस दवाखाने याच रस्त्यावर आहेत त्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात कायम वर्दळ या रस्त्यावर असते परंतु या रस्त्याच्या मधोमध मोठा खड्डा पडलेला आहे. या खड्ड्यात वाहनांचे चाक अडकून पडल्याने घसरून अनेक जणांचा अपघात झाला आहे . याबाबत नागरिकांनी वेळोवेळी प्रशासनाकडे तक्रारी केल्या आहेत. परंतु त्याकडे नगर परिषद प्रशासनाकडून दुर्लक्ष करण्यात आले. अखेर नाईलाजाने या भागातील नागरिकांकडून माती खड्डे टाकून तो बुजवण्याचा प्रयत्न केला होता .परंतु काही दिवसातच ती माती ,खडी निघून जाते .काही नागरिकांनी त्यामध्ये सिमेंट क्राक्रीट टाकले होते .परंतु नव्याने टाकलेले कॉंक्रीट जुन्याला पकड धरत नसल्यामुळे ते लगेच निघून जाते .पाऊस पडला किंवा पाणी साचल्यास खड्डा दिसत नाही. त्यावेळी अनेकांना पाठीच्या मणक्याला दणका बसण्याचा अनुभव या ठिकाणी आलेला आहे. नगरपालिका प्रशासना या समस्यांकडे लक्ष देऊन लवकरात लवकर खड्डा बुजवावा व नागरीकांना त्रासातुन मुक्त करावी अशी मागणी सचिन आदनाक,दिपक कुलकर्णी, अर्जुन काळे, ईश्वर गुंजाळ,प्रशांत माने या नागरिकांनी केली आहे.

जाहीर प्रगटन

मा. श्रीमती एस.एस. पिंगळे, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २०८/२०२५

ॲड. व्ही. एस. ढाकणे

रमेश तुकाराम जाधव वि. निरंक

अर्जदार -१. रमेश पि. तुकाराम जाधव, वय-६२ वर्षे, धंदा-व्यापार रा. सर्व्हे नं.४९, प्लॉट नं.५८, नगर रोड, मेडीपॉईन्ट हॉस्पीटल जवळ, चंदन नगर, पुणे, ता.जि.पुणे., २. किशोर पि. तुकाराम जाधव, वय ५६ वर्षे, धंदा-नौकरी रा. नेहा निवास, ज्ञानेश्वर नगर, आय.टी.आय. च्या पाठीमागे, बीड, ता.जि. बीड., ३. रविंद्र पि. तुकाराम जाधव, वय-५० वर्षे, धंदा-खाजगी नौकरी, रा. ३०४, सुशील रेसिडेन्सी, प्लॉट ६७/१, ओल्ड ठाणा नाका गार्डन हॉटेल जवळ, पनवेल जि. रायगड. , ४. देवेंद्र पि. तुकाराम जाधव, वय-४४ वर्षे, धंदा-नौकरी रा. देशपांडे गल्ली, माळीवेस, बीड, ता.जि.बीड., ५. महेंद्र पि. तुकाराम जाधव, वय-४१ वर्षे, धंदा-खाजगी नौकरी, रा. सदर

६. मिनाक्षी भ्र.श्रीनिवास जाधव, वय ६४ वर्षे, धंदा-घरकाम, रा. दालगडे ऑफिस जवळ, शिवपुरी रोड, उमरगा ता. उमरगा जि. उस्मानाबाद., ७. मनिषा पि. श्रीनिवास जाधव, वय ४१ वर्षे, धंदा-घरकाम, रा. उमरगा, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद., ८. माधवी भ्र. बसवराज बिरादार, वय ३८ वर्षे, धंदा-घरकाम, रा. गट नं.१९७, शिवसाई प्रॉपर्टीज, खटाटे वस्ती, सोरतपवाडी पुणे, ता.जि.पुणे., ९. मंजुश्री भ्र.नितीन भोसले, वय-३६ वर्षे, धंदा-घरकाम, रा. आनेवाडी ता. जावळी, जि. सातारा., १०. गणेश पि. श्रीनिवास जाधव, वय ३० वर्षे, धंदा खाजगी नौकरी, रा. शिवपुरी रोड, उमरगा, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद, ११. रत्नमाला भ्र. सखाराम कळासे, वय-६३ वर्षे, धंदा-घरकाम, रा. बस स्थानक, छत्रपती कॉलनी, बीड, ता.जि.बीड, १२. विद्या भ्र.लहुराव चौरे, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. तळेपिंपळगांव, ता. पाटोदा, जि. बीड, १३. संध्या भ्र.रमेश शिंदे, वय ५३ वर्षे, धंदा-घरकाम, रा. तुळजाई निवास, ओमकार नगर ५०८, उमरगा ता. उमरगा, जि. उस्मानाबाद.

गैरअर्जदार निरंक

प्रकरणः भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत क्र.१) तुकाराम पि. रानाप्पा जाधव व मयत क्र.२) शकुंतलाबाई भ्र. तुकाराम जाधव यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत क्र.१) तुकाराम पि. रानाप्पा जाधव हे दिनांक २२/०९/२०२२ रोजी माळीवेस, देशपांडे गल्ली, बीड, ता.जि.बीड येथे मयत झालेले आहेत. तसेच मयत क्र. २) शकुंतलाबाई भ्र. तुकाराम जाधव हया दिनांक २५/०५/२०१६ रोजी माळीवेस, देशपांडे गल्ली, बीड, ता.जि.बीड येथे मयत झालेल्या आहेत. मयत क्र.१ व २ हे आपसात पती-पत्नी होते. अर्जदार क्र. १ ते ५ हे मयतांचे मुले असुन अर्जदार क्र.६ ही मयतांची सुन असुन अर्जदार क्र. ७ ते ९ हया मयतांच्या नाती आहेत तर अर्जदार क्र. १० हा नातु असून अर्जदार क्र.११ ते १३ हया मयतांच्या विवाहीत मुली आहेत. मयतांना अजुन एक मुलगा नामे श्रीनिवास तुकाराम जाधव हा होता, परंतु तो दिनांक १८/०४/२०१० रोजी मयत झालेला आहे. अर्जदार क्र. ६ ही मयत श्रीनिवास यांची पत्नी असून अर्जदार क्र. ७ ते ९ हया मुली व अर्जदार क्र. १० हा मयत श्रीनिवास यांचा मुलगा आहे. दोन्ही मयतांचे पश्चात मयतास अर्जदाराशिवाय इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु मयत नामे क्र.१) तुकाराम पि. रानाप्पा जाधव व मयत क्र. २) शकुंतलाबाई भ्र. तुकाराम जाधव या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे क्र.१) तुकाराम पि. रानाप्पा जाधव व मयत क्र. २) शकुंतलाबाई भ्र. तुकाराम जाधव रा. माळीवेस, देशपांडे गल्ली, बीड, ता.जि. बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील तारीख ०३/०४/२०२५. आज दिनांक ३१/०१/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

स्वाक्षरित
क. लिपीक

शिक्का

जाहीर प्रगटन

मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २०९/२०२५

CNR No. MHBI0200003792025

(मार्फत ॲड. व्ही. एस. ढाकणे)

गणेश श्रीनिवास जाधव व इतर ४ वि. निरंक

अर्जदार : १. गणेश पि. श्रीनिवास जाधव, वय ३० वर्षे, धंदा-खाजगी नौकरी, रा. शिवपुरी रोड, उमरगा, ता. उमरगा जि. उस्मानाबाद, २. मिनाक्षी भ्र. श्रीनिवास जाधव, वय ६४ वर्षे, धंदा घरकाम, रा. दालगडे ऑफिस जवळ, शिवपुरी रोड, उमरगा ता. उमरगा जि. उस्मानाबाद, ३. मनिषा पि. श्रीनिवास जाधव, वय ४१ वर्षे, धंदा-घरकाम, रा. उमरगा ता. उमरगा जि. उस्मानाबाद, ४. माधवी भ्र. बसवराज बिरादार, वय-३८ वर्षे, धंदा-घरकाम, रा. गट नं. १९७, शिवसाई प्रॉपर्टीज, खटाटे वस्ती, सोरतपवाडी पुणे ता. जि. पुणे, ५. मंजुश्री भ्र. नितीन भोसले, वय-३६ वर्षे, धंदा-घरकाम, रा. आनेवाडी ता. जावळी जि. सातारा

विरुध्द निरंक

मागणी अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत. वरील अर्जदार क्र. १ ते ५ यांनी या न्यायालयात मयत श्रीनिवास पि. तुकाराम जाधव यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत श्रीनिवास पि. तुकाराम जाधव यांचा मृत्यु दिनांक १८/०४/२०१० रोजी बीड येथे त्यांचा मृत्यु झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा असून अर्जदार क्र. २ ही मयताची पत्नी आहे. व अर्जदार क्र. ३ ते ५ या मयताच्या मुली आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत श्रीनिवास पि. तुकाराम जाधव यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख ०७/०३/२०२५ आज दिनांक ०५ माहे फेब्रुवारी २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

स्वाक्षरित
क. लिपीक

शिक्का

शिवजयंती समितीची कार्यकारिणी जाहीर, कार्याध्यक्ष घनश्यामदास गोयल

जालना । प्रतिनिधी

येथील शिवछत्रपती सांस्कृतिक क्रीडा मंडळ संचलित सार्वजनिक छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून अध्यक्षपदी सतीश जाधव, कार्याध्यक्षपदी उद्योजक घनश्यामदास गोयल, सचिवपदी निकाळजे तर स्वागताध्यक्ष ॲड रविंद्र डुरे यांची निवड करण्यात आली आहे. आगामी शिवजन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राजमाता गड येथे सोमवारी (ता. ०३) बैठक घेण्यात आली. यावेळी अंकुशराव देशमुख, अंकुशराव राऊत, सर्जेराव जाधव, वामनराव राऊत,नारायण गजर,विशाल बनकर, शिवप्रकाश चितळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.बैठकीत विचार विनीमय करून सर्वानुमते कार्यकारिणी निवडण्यात आली.

उर्वरित कार्यकारिणी पुढील प्रमाणे सहसचिव: आनंद वाघमारे,कोषाध्यक्ष: विशाल बनकर, सहकोषाध्यक्ष: शेख जहीर,मार्गदर्शक : अंकुशराव देशमुख, अंकुशराव राऊत, सर्जेराव जाधव, वामनराव राऊत, सुभाषचंद्र देवीदान,विजयकुमार पंडित, ॲड.ब्रम्हानंद चव्हाण, मनोहर सिनगारे, सुभाष कोळकर, राजेंद्र राख, ओमप्रकाश चितळकर, राजेंद्र गोरे, उपाध्यक्ष: नंदकिशोर जांगड़े, नारायण गजर, शिवप्रताप चितळकर, विजय पवार,राहुल रत्नपारखे,विमलताई आगलावे,शीतल तनपुरे, आयेशा खान, संध्या देठे, वंदना खंडेभराड, विभावरी ताकट, रेखा गंगातीवारे,जांगडे ,प्रसिद्धी प्रमुख: आशीष रसाळ ,जावेद तांबोली. कार्यकारिणी सदस्य:रमेश देहेडकर, विट्ठल शिर्के, डॉ.धनसिंग सूर्यवंशी,बाला परदेशी, अशोक गायकवाड, सतिश कुरील, महेंद्र अकोले, खंडेश जाधव, कपिल जांगड़े,मेघराज चौधरी, दिनकर घेवंदे,समीर शेख, विक्रांत देशपांडे, विलास तिकांडे, बालू काळे, संदीप झारकंडे, राजेंद्र हिवाळे, रामदास जाधव, अनंतराजे जाधव, पंकज सावजी, प्रमोद गंडाळ, गजानन लाखोले, श्रीकांत मालोदे, संतोष गाजरे, अशोक शहाणे, मुन्ना चित्राल, मधुकर घेवंदे,सचिन राऊत, अक्षय राऊत, गोविंद चित्राल, शरद मांगधरे , ॲड़. शैलेश देशमुख,आकाश जगताप,भरत पाचफुले , राजु माधोवाले, संचेती , राजू नरवैये, पारसनंद यादव,सतीश ससाने , अर्जुन जगताप, कैलाश जाधव, मनीष तवरावाला , सागर देवकर , विजय राउत,प्रमोद साळुके, गणेश सुपारकर,नितिन उकंडे, संजय गायकवाड,दत्ता मालूसरे, कैलाश भूतेकर, गणेश तरासे, जगदीश तिवारी, अमोल राऊत,दुर्गेश काठोठीवाले, विजय पवार,प्रवीण बावने, सुरेश राऊत , शांतीलाल राऊत, किशोर पांगारकर, किशोर मघाडे,दीपक रामरख्या, हितेंद्र त्रिवेदी, सदगुरे,जानकीराम खंदारे , अमोल काटकर, राजेश माळवतकर , राजेंद बनकर चेतन गौरक्षक, अभिजीत मोरे, अशोक माकोड़े,भरत परदेशी, दत्ता बावने, राहुल आदमाने, मनोज लाखोले, किशोर बोबडे, रूपेश राऊत, राजेश जगताप, संतोष मोहिते, विनोद पवार, संजय एखंडे,रविंद्र भूतेकर,ओम राऊत, भुषण बनकर, उमेश दाड, सुधीर राऊत, दिनेश बनकर ,योगेश भवर ,रवींद्र नवघरे, सुभाष भूरेवाल, सुरेश गाजरे ,धर्मेंद्र बनकर, दीपक जगताप ,अनिल राऊत, रुपेश जैस्वाल, सतीश बाभळे, संदीप नाईकवाडे ,किशोर जुनगडे, रवींद्र वाघमारे ,संदेश कोटेचा ,विलास राऊत ,जालिंदर वायाळ,

नवीन शैक्षणिक धोरणात पालक शिक्षक विद्यार्थी यांची भूमिका महत्त्वाची -प्राचार्य डॉ विश्वास कदम

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात ४ फेब्रुवारी २०२५ रोजी माजी विद्यार्थी संघटना व महाविद्यालयाच्या वतीने पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले या मेळाव्याचे उद्घाटन माननीय रणवीर काका पंडित यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉक्टर विश्वासराव कदम हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माननीय बप्पासाहेब जाधव मा दिलीप भाऊ जाधव माननीय शिवभूषण जाधव सामाजिक कार्यकर्ते माननीय सज्जाद भाई सय्यद माननीय विनोद गरजे माननीय पत्रकार विजय जाधव व्यासपीठावर उपस्थित होते मान्यवरांच्या हस्ते या पालक मेळाव्याचे दीप प्रज्वलित करून उद्घाटन करण्यात आले यानंतर मान्यवरांचा सत्कार करून या कार्यक्रमाचे प्रस्ताविक महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य

प्रोफेसर सोमनाथ घाडगे यांनी केले नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थी पालक शिक्षक यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून या नवीन शैक्षणिक धोरणाची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी पालकांना माहिती व्हावी या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमात माननीय रणवीर काका पंडित यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांनी नवीन शैक्षणिक धोरणाचा अंगीकार करून आपल्याला आवडत्या शैक्षणिक संधी घेऊन गुणवत्तापूर्वक शिक्षण घेण्याची आवाहन केले तर प्राचार्य डॉक्टर विश्वास कदम सर यांनी मार्गदर्शन करताना नवीन शैक्षणिक धोरणात पालक शिक्षक विद्यार्थी यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून गुणवत्ता पूर्वक शिक्षण व कौशल्यावर आधारित शिक्षण व्यवस्था निर्माण करण्यासाठी पालकाची भूमिका महत्त्वाची असल्याचे मनोगत व्यक्त केले माननीय श्री सज्जाद भाई यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांनी शिक्षक पालक आणि विद्यार्थी या प्रक्रियेत शिक्षण घेत असताना तिघांची भूमिका महत्त्वाची असल्याची प्रतिपादन व्यक्त केली तर माननीय विनोद गरजे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना देश सेवेसाठी भारतीय संरक्षण दलात सहभाग घेतला पाहिजे आणि देश सेवा केली पाहिजे असे आवाहन केले या कार्यक्रमाचे आभार प्राध्यापक शिवाजीराव भोरे यांनी मांडली तर सूत्रसंचालन डॉक्टर अशोक देवगुडे यांनी केले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक विद्यार्थी पालक विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

विद्यार्थ्यांनी परिश्रम घेऊन यश संपादन करावे -शंकर शिंदे

बीड । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी आयुष्यामध्ये कितीही मोठे संकट आले तरी डगमगून न जाता आत्मविश्वासाने सामोरे गेले पाहिजे. जिद्द, चिकाटी आणि काठोर परिश्रम घेऊन यश संपादन केले पाहिजे असे प्रतिपादन पोलीस उपअधिक्षक शंकर शिंदे यांनी केले.

नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, मोरगाव येथे इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने निरोप देण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच लिंबाजीराव जाधव हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून पोलीस उपअधिक्षक शंकर शिंदे हे होते.

यावेळी पुढे बोलताना पोलीस उपअधिक्षक शंकर शिंदे म्हणाले की, ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांमध्ये अपयश पचवण्याचे आणि येणार्या संकटाशी भिडण्याचे धाडस असते. विद्यार्थ्यांनी परिक्षेत यश संपादन करून आपल्या शाळेचे, गुरूजनांचे व आई-वडीलांचे नाव मोठे केले पाहिजे. वाचनाने माणूस समृध्द होतो म्हणून प्रेरणादायी पुस्तकांसह महापुरूषांच्या पुस्तकांचे वाचन केले पाहिजे. वाचन संस्कृती टिकणे ही काळाची गरज आहे असे त्यांनी सांगितले. नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य दत्तात्रय माटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.आर.आर. उगले यांनी केले. यावेळी परिसरातील प्रतिष्ठीत नागरिक, पालक, विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पर्यवेक्षक भाऊसाहेब वाणी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी परिश्रम घेतले.

अंबाजोगाई शहरात आंतरराष्ट्रीय सहकार दिंडीचे भव्य स्वागत

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरात आंतरराष्ट्रीय सहकार दिंडीची शोभायात्रा पोहोचतात जोरदार स्वागत करण्यात आले. शहरांमध्ये ''स्वर्गीय वैकुंठ भाई मेहता सहकार दिंडीचे आयोजन महाराष्ट्र शासन सहकार खाते महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन लिमिटेड मुंबई , फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड पुणे च्या वतीने आयोजित करण्यात आले होते.

''आंतरराष्ट्रीय सहकार परिषद २०२५ शिर्डी'' येथे ९ फेब्रुवारी २०२५ रोजी होत आहे. या आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेमध्ये ४० देशाचे प्रतिनिधी, भारत देशाचे सहकार मंत्री अमित शहा, तसेच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र

फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील तसेच अनेक मंत्री महोदय आणि सहकार क्षेत्रामध्ये काम करणारे सर्व दिग्गज मंडळी उपस्थित राहणार आहेत. इतिहासाच्या कालखंडामध्ये मैलाचा दगड ठरणारी ही ऐतिहासिक परिषद होणार आहे. आणि या परिषदेच्या प्रचार आणि प्रसार व्हावा म्हणून सहकार दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.. ही सहकार दिंडी आज रोजी अंबाजोगाई शहरांमध्ये दाखल झाली आणि संपूर्ण शहरामध्ये या दिंडीचे शोभायात्रा शहरातील श्री गुरु शंभुलिंग शिवाचार्य महाराज मठ संस्थान अंबाजोगाई यांच्या शुभहस्ते दिंडीचे पूजन करून तसेच राजकिशोर मोदी, नंदकिशोर मुंदडा, सहाय्यक निबंधक कुलकर्णी , सहकार अधिकारी संतोष भंडारी , लक्ष्मणराव गोरे , बाजीराव धर्माधिकारी, भगवानदास सारडा, कचरू लाल सारडा, एपीसी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी देशपांडे , शेख सर, गोविंद येडे , अशोक वैद्य, फारुकी, रघुनाथ जगताप, रिकबसेठ सोळंकी, एड. सोळंके ,एड. बाबा शिरसाट, प्रा अरुणराव अर्धापूर , मनोज देशमुख, विजय राऊत, गजानन कुलकर्णी , बाळासाहेब माने, बी.एस घाडगे, राजू मोरे, तानाजी जाधव, बिबीषन देशमुख ,नाथ रेड्डी, सुनील सौंदरमल , अंबाजोगाई मेडिकल प्रॅक्टिशनर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ राहुल धाकडे व अंबाजोगाई, परळी, घाटनांदुर, परिसरातील सर्व पतसंस्थांचे अध्यक्ष संचालक आणि कर्मचारी सहभागी झाले होते. या सर्वांनी अतिशय उत्स्फूर्तपणे दिंडी मध्ये सहभागी झाले यामध्ये महिलांची ही संख्या असंख्य होती.

आई-बापाची मान शरमेने खाली जाईल असं वागू नका -प्रा.मुकुंद राजपंखे

दिंद्रुड । प्रतिनिधी

मुलांच्या भविष्याप्रती आई वडिलांचे मोठ मोठी स्वप्न असतात. त्यासाठी पडेल ते कष्ट करण्याची त्यांची तयारी असते. त्यामुळे मायबापाची स्वप्नपूर्ती करण्यासाठी मुलांनी अथक परिश्रम घ्यायला हवेत. मुलींनो, आई बापाची मान शरमेनं खाली जाईल असं आयुष्यात कधीही वागू नका असे भावनिक आवाहन प्रसिद्ध कवी प्रा. मुकुंद राजपंखे यांनी केले. इंदिरा गांधी कन्या शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील शार्दुलेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या इंदिरा गांधी कन्या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन बुधवारी सकाळी पार पडले. संस्थेचे सचिव रामकृष्ण सोळंके कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. तर सुप्रसिद्ध कवी मुकुंद राजपंखे, माजलगाव येथील ग्रामीण कवी बालाप्रसाद चव्हाण, माजी सरपंच श्रीराम काळे, शेख, यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमास होती. व्यासपीठावर विद्यार्थिनी प्रतिनिधी पूनम गोरे, सीमा शिंदे, नंदिनी गवळी सह यांची उपस्थिती होती. प्रस्ताविकात मुख्याध्यापक अशोक बोचरे यांनी शाळेच्या सांस्कृतिक, क्रीडा, शिक्षण, हरित सेना, ग्रंथालय आदी विषयांवरील प्रगतीचा वार्षिक अहवाल सादर केला. कवीवर्य मुकुंद राजपंखे व बालाप्रसाद चव्हाण यांनी ग्रामीण भागातील व्यवस्थेवर प्रकाश टाकणाऱ्या विविध कवितांचा ठेवा विद्यार्थ्यांसमोर मांडला. जनमानसात महिलांचे योगदान व मूलगा आणि मुलगी यांच्यातील भेदाभेद यावर राजपंखे यांनी जळजळीत भाष्य केले. तर चव्हाण यांनी सादर केलेल्या सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित कवितेने वाहवा मिळवली. स्नेहसंमेलन प्रमुख एस.एन.भालेकर सांस्कृतिक विभाग प्रमुख रामराव लांडगे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कु. स्नेहल जायभाये व कु.अंजली शेंडगे यांनी कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन केले.

सुभाषराव आप्पा मेहेत्रे यांना बंधूशोक

रायमोहा । प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील रायमोहा येथील

जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुभाषराव सदाशिवराव मेहेत्रे यांचे थोरले बंन्धू अनिल सदाशिव मेहेत्रे यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी दु:खद निधन झाले शोकाकूल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले त्याप्रसंगी श्री क्षेत्र गहिनीनाथगडाचे मठाधिपती ह भ प विठ्ठल महाराज शास्त्री,माजी आमदार सुनिलराव धांडे सर, माजी जिल्हा परिषद सदस्य सुभाषराव क्षीरसागर ,मदन जाधव,भाजपा नेते गोकुळ सानप,रायमोहाकर, भरत जाधव,सुभाष सांगळे सर,जालींदर सानप,हाशम शेख,बापुसाहेब येळे,चेंडाराम डोळे,विजयकुमार बापु जाधव,भास्कर बप्पा जाधव,केशव राजगुरु, सातपुते सर उपस्थितीत होते अनिल मेहेत्रे यांचा दशक्रियाविधी ८ फेब्रवारी रोजी राययोहा येथे होईल

जिल्ह्यातील सीसीआय कापूस खरेदी केंद्र बंद ठेऊ नका-खा.कल्याण काळे

जालना । प्रतिनिधी

जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील हजारो शेतकरी कापूस उत्पादक असून, त्यांचे आर्थिक भवितव्य कापसाच्या योग्य दराने विक्रीवर अवलंबून आहे. मात्र सध्या भारतीय कापूस निगम () चे खरेदी केंद्र कधी बंद कधी चालु असल्याने शेतकऱ्यांना आपल्या कष्टाने पिकवलेल्या कापसाची योग्य बाजारपेठ मिळत नाही. परिणामी, ५०% पेक्षा जास्त शेतकऱ्यांचा कापूस अजूनही त्यांच्या घरी पडुन आहे.

शासनाच्या हमीभावानुसार () कापूस खरेदी व्हावी, याकरिता ची खरेदी केंद्रे सुरू असणे अत्यंत आवश्यक आहे. पण केंद्र बंद असल्याने शेतकरी खुले बाजारपेठेवर अवलंबून राहत असून, त्यांना हमीभावापेक्षा कमी दराने कापूस विक्री करावा लागत आहे. याचा थेट फटका शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला बसत असून, त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.

करिता भारतीय कापूस निगमचे कापूस खरेदी केंद्र त्वरित सुरू करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही. तसेच, खरेदी केंद्र कधी बंद कधी चालु का आहे? याबाबतची सविस्तर माहिती उपलब्ध करून द्यावी. शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने आणि त्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी त्वरित कार्यवाही करावी असे आशयाचे पत्र भारतीय कापुस निगमने उपमहाव्यवस्थापक व जिल्हाधिकारी, जालना व छत्रपती संभाजीनगर यांना दिले.

विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी सात गावच्या शेतकऱ्यांचा आज आक्रोश मोर्चा

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील खांडे पारगाव परिसरातील सात गावामध्ये विजेचा लपंडाव सुरू आहे. शेतकरी नागरिक त्रस्त झाले आहेत. शेतकऱ्याची पीक करपून गेली आहे. गावात लाईट नसल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे, असुन यासह विविध मागण्यांसाठी उद्या होणाऱ्या शेतकरी मोर्चास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन शिवसंग्राम शेतकरी आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे सह आदींनी केले.

सध्या चालू महिन्यात १० वी १२ वी परीक्षा आहेत मुलांना अभ्यास करता येत नाही. लाखो रुपये खर्च करून हि आमच्या मुलाचं भविष्य अंधारात का? सात गावात लाईट नसल्याने पाणी पंप, पिठाच्या गिरण्या, बंद आहेत नागरिक हैराण झाले आहेत.

खांडे पारगाव परिसरातील खांडे पारगाव, अंथरवन प्रिंप्रि, नागपूर खुर्द, उमरी, नागपूर बुद्रुक, उमरद खालसा, अंथरवन प्रींप्री या सात गावातील विद्युत पुरवठा सुरळीत करा, शेतकऱ्यांना दिवसाचा उच्च दाबाने विद्युत पुरवठा करावा, सात गावांसाठी मजूर ५ ट्रान्सफॉर्मर तत्काळ बसावा, नवीन सबस्टेशन सात गावात मंजूर करा, विद्युत तारा तत्काळ बदलण्यात याव्यात, इंजि भागा नगरे यांची तत्काळ बदली करण्यात यावी या मागण्यासाठी सात गावातील शेतकरी, नागरिक , महिला सह शाळकरी विद्यार्थी यांनी आज दि. ०६ फेब्रुवारी गुरुवार रोजी अधीक्षक अभियंता कार्यालयात महावितरण जालना रोड येथे उपस्थित राहावे, असे आवाहन शिवसंग्राम शेतकरी माजी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

अल्पवयीन मुलीचा विनयभंग; रोडरोमिओवर गुन्हा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

एका अल्पवयीन मुलीचाक्ष विनयभंग करून तिला जीवे मारण्याची धमकी दिल्याची धक्कादायक घटना अंबाजोगाई शहरात उघडकीस आली आहे. याप्रकरणी अंबाजोगाई पोलीस ठाण्यात एका रोडरोमिओवर गुन्हा दाखल करण्यात आहे.

अशोक काळे (रा. भिसे यांचे वाडा, प्रशांतनगर, अंबाजोगाई) असे त्या आरोपी तरुणाचे नाव आहे. याने १३ नोव्हेंबर २०२४ ते १९ जानेवारी २०२५ या कालावधीत १४ वर्षीय अल्पवयीन पीडितेचा सतत पाठलाग केला आणि छेडछाड करून विनयभंग केला. तसेच, याबाबत घरी सांगितल्यास तिला आणि तिच्या कुटुंबियांना जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या असे पिडीतीने अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत नमूद आहे. सदर फिर्यादीवरून पोलिसांनी अशोक काळे याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सपोनि जाधवर करत आहेत.

शिक्षक, विद्यार्थ्यांनी घेतले सूर्यनमस्काराचे प्रशिक्षण

अंबड । प्रतिनिधी

दि. ४ फेब्रुवारी रोजी मस्त्योदरी विद्यालय लोणार भायगाव (ता.अंबड)येथील शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सोबतच सुमारे अडीचशे विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्काराचे प्रशिक्षण घेतले. तज्ञ प्रशिक्षक म्हणून शाळेतील शिक्षक नारायण शिंदे यांनी सर्वां कडून सूर्यनमस्कार करवून घेतले.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक केशव अटकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की मानवाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी योग,ध्यान आणि प्राणायाम महत्वाचे आहेत.सर्वांनी आपल्या रोजच्या कामाच्या व्यापात योग साधनेसाठी वेळ दिला पाहिजे,योगा मुळे विचार सकारात्मक होण्यास मदत मिळते आणि ध्यानधारणेने स्मरणशक्ती वाढते,मुलांच्या उत्तम आरोग्या साठी आणि बौद्धिक विकासा साठी योग साधना आवश्यक आहे.

यावेळी शाळेतील शिक्षक शकील मोमीन,रतन सिंग चरावंदे, विनोद गवळी,ज्ञानेश्वर शेळके,विलास पवार, शैफ शेख , दिलीप पैठने, सुखदेव लबडे आणि पांडूरंग बोडखे उपस्थित होते

मनुष्य जीवनात साधूसंतांच्या कृपेशिवाय प्रगती अशक्य - महंत दत्ता महाराज गिरी

श्रीक्षेत्र गोरक्षनाथगडावर हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता

गेवराई । प्रतिनिधी

मनुष्य जीवनात प्रत्येकाने साधु संतांचे आशीर्वाद घेतले पाहिजेत कारण संत हे पृथ्वीतलावर देवाचा अवतार घेवून जन्म घेतात. तर संत कृपेसाठी प्रत्येकाने या ज्ञानयज्ञ मंडपात आले पाहिजे. देव, संत आणि आपण एकरुप झालो की तो काला होतो. परमार्थात भक्तीतल्या काल्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. तर मनुष्य जीवनात साधूसंतांच्या कृपेशिवाय प्रगती करणं अशक्य आहे. असे प्रतिपादन श्री क्षेत्र गोरक्षनाथ संस्थानचे महंत गुरुवर्य दत्ता महाराज गिरी यांनी व्यक्त केले.

श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थान, कुंभेजळगाव (ता.गेवराई) येथे वै.ब्रम्हनिष्ठ गुरुवर्य महंत ह.भ.प.वामन म. गिरी यांच्या ५३ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची बुधवार दि.५ फेब्रुवारी रोजी महंत ह.भ.प दत्ता म. गिरी यांच्या काल्याच्या कीर्तनाने उत्साहात सांगता झाली. यावेळी ते बोलत होते. यावेळी भक्तमंडळींनी महंत दत्ता महाराज यांचे ढोलताशासह टाळ मृदगांच्या गजरात भव्य मिरवणूक काढून जल्लोषात स्वागत केले.

यावेळी युवा नेते रणवीर पंडित, भाजप तालुकाध्यक्ष प्रकाश सुरवसे, भाजप समन्वयक श्रीकांत सानप, परमेश्वर म.वाघमोडे, दामोदर भोसले, पांडुरंग म.जाधव, सुघोष मुंडे , शिवाजी म.गिरी, जेष्ठ पत्रकार सुभाष सुतार, पत्रकार विनोद नरसाळे, संपादक अमोल वैद्य, कैलास म.गिरी, नामदेव म.पौळ, तुकाराम म.गिरी, उमेश भोसले, श्रीधर पौळ, दादाभाऊ ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corperation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email :rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

राजकीय दबावाला बळी पडू नका! पुण्यातील अनियमित पाणीपुरवठ्यावरुन चंद्रकांत पाटील आक्रमक

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहरामध्ये पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस वाढत आहे. पुणे शहरातील येत्या गुरुवारी देखील पाणीपुरवठा बंद आहे. कोथरूडमध्ये सुद्धा पाण्याचा मोठा प्रश्न आहे. कोथरूड मतदारसंघातील अनियमित पाणीपुरवठ्यावर राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा कोथरूडचे आमदार चंद्रकांत पाटील चांगलेच संतप्त झाल्याचे पाहायला मिळालं. कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता, नियमीत पाणीपुरवठा करावा अशा सक्त सूचना त्यांनी यावेळी दिल्या. कोथरुड विधानसभा मतदारसंघातील पाणीपुरवठ्यासंदर्भात महापालिकेचे पाणी पुरवठा अधिकारी, व्हॉलमन आणि नागरीक अशी संयुक्त बैठक कोथरूड मधील अंबर हॉल येथे झाली. या बैठकीत ते बोलत होते.

यावेळी पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप, कार्यकारी अभियंता शंकर कोडूसकर कोथरूड बावधन क्षेत्रीय कार्यालयाचे विजय नायकल, वारजे-कर्वेनगरचे दीपक राऊत, औंध-बाणेरचे गिरीश दापकेकर, भाजपा कोथरुड दक्षिण अध्यक्ष डॉ संदीप

बुटाला, उत्तरचे अध्यक्ष सचिन पाषाणकर, पुणे शहर सरचिटणीस पुनीत जोशी, गणेश कळमकर यांच्या सह सर्व माजी नगरसेवक तथा पाणी पुरवठा विभागाचे सर्व अधिकारी, कर्मचारी, व्हॉलमन उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीला आमदार चंद्रकांत पाटील यांनी कोथरूड मधील विविध भागातील पाणीपुरवठ्याबाबतच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी उपस्थित माजी नगरसेवकांनी अनियमित पाणी पुरवठ्याबाबतच्या तक्रारींचा पाढा वाचला. गेल्या काही वर्षांपासून महापालिका वेगवेगळ्या भागात दर गुरुवारी पाणीपुरवठा बंद असल्याचे जाहीर करते. मात्र, त्यानंतर पुढील दोन-चार दिवस पाणीपुरवठा सुरळीत होत नाही. तसेच, बालेवाडी गावठाणमध्ये ठिकाणी दहा-दहा दिवस पाणीपुरवठा होत नाही. तर एसएनडीटी येथील समान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पाण्याची टाकी उभारली असली, तरी ते काम निकृष्ट झाले असून, टाकी सुरु होण्यापूर्वीच गळती लागल्याचे निदर्शनास आणून दिले. तसेच अनेक भागात पाणीपुरवठा करणारे कर्मचारी कामात कुचराई करत असल्याचे निदर्शनास आणले. त्यावर आमदार पाटील यांनी संतप्त होत अधिकाऱ्यांना खडेबोल सुनावले. पुणे महापालिकेच्या २४ह्७ योजनेअंतर्गत पहिली पाण्याची टाकी बाणेर बालेवाडी मध्ये कार्यान्वित झाली. त्यानंतर उर्वरित पुण्याला मार्गदर्शक ठरेल, असे याचे कार्यन्वयन सुरू झाले. पाण्याच्या टाक्या बांधण्याचे काम सुरू आहे. समान पाणीपुरवठ्यासाठी प्रत्येक घरात मिटर लावण्याचा निर्णय झाला असून, त्याचेही काम सुरू होईल. असे मत आमदार चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले.

ते पुढे म्हणाले की, दुसरीकडे पाणीपुरवठ्याबाबत अनेक तक्रारी वारंवार येत आहेत. सदर तक्रारमध्ये अनेक भागात राजकीय दबावामुळे अनियमित पाणीपुरवठा होत असल्याचे समोर येत आहे. त्यामुळे ही बाब खपवून घेतली जाणार नाही. पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी कोणत्याही राजकीय दबावाला बळी पडू नये. पाणी ही अत्यावश्यक बाब असल्याने नागरिकांना त्यापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न केल्यास कठोर पावले उचलावी लागतील, अशी संतप्त प्रतिक्रिया आमदार पाटील यांनी व्यक्त केली.

भाजी विक्रेत्याची दुचाकी घेऊन भाडेकरू फरार; सणसवाडीतील

शिक्रापूर : सणसवाडी (ता.शिरुर) येथील आनंदनगरमध्ये भाजी विक्रेत्याची दुचाकी घेऊन भाडेकरू फरार झाल्याची घटना घडली. विनोद वाघे यांचे भाजी विक्रीचे दुकान असून, सदर दुकानासमोर रोहिदास गाडेकर यांच्या खोलीमध्ये गुरुदास पाटील भाडेकरू म्हणून राहत होता. दररोज भाजी घेण्यास येत असल्याने गुरुदासची ओळख विनोद यांच्यासोबत झाली होती.

गुरुदास याच्याकडे काही उधारी झालेली असल्याने विनोद यांनी त्याला पैसे मागितले असता त्याने माझी पत्नी व मुले गावाला आहेत. त्यांना घेऊन येथून मित्राकडून पैसे आणायचे असे सांगून गुरुदासने विनोद यांना दुचाकी मागितली. तेव्हा विनोद यांनी त्यांची दुचाकी त्याला दिली. त्यांनतर गुरुदास परत आलाच नसल्याने त्याला मोबाईलवर संपर्क केला. मात्र, तो उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला. त्यांनतर त्याचा मोबाईल नंबर बंद झाला. त्यामुळे विनोद याने खोलीमालक रोहिदास गाडेकर यांच्याकडे चौकशी केली.

तेव्हा गुरुदास याने परस्पर खोली खाली करुन पत्नी व मुलाला घेऊन गेल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे विनोद यांची दुचाकी घेऊन तो फरार झाल्याचे लक्षात आल्याने याबाबत विनोद रघुनाथ वाघे (वय ३३ वर्षे रा. मलठण फाटा शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी गुरुदास पाटील (रा. जळगाव जि. जळगाव) याचे विरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस हवालदार रविकिरण जाधव हे करत आहे.

आत्महत्येवरील चर्चांनी कुटुंबीयांना दुःख, पण शिरीष महाराजांनी संत तुकाराम महाराजांची परंपरा जपली

पुणे : जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचे वंशज असलेल्या शिरीष महाराज मोरेंनी आत्महत्या केल्यानंतर त्यांच्या आत्महत्येची कारणे समोर आली आहेत. मृत्यूपूर्वी त्यांनी ४ चिठ्ठ्या लिहून आपण हे टोकाचं पाऊल का उचलत असल्याचे स्पष्ट केले. देहूतील राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. मंगळवारी रात्री ते जेवण केल्यानंतर झोपायला गेले. मात्र, सकाळी खोलीचे दार उघडलेले दिसेना. त्यामुळं दार तोडले असता त्यांनी उपरण्याच्या साह्यानं गळफास घेतल्याचं समोर आलं. आर्थिक विवंचनेतून हे पाऊल उचलल्याचं सुसाईड नोटमध्ये शिरीष महाराज मोरे यांनी नमूद केलं होतं. या घटनंतर समाजमाध्यमं व समजात कर्जामुळे त्यांनी आत्महत्या केल्याची चर्चा रंगली आहे. मात्र, त्यांनी कोणाचे कर्ज बुडू नये याची काळजी घेत आपल्यावरील कर्ज फेडण्याचं आवाहन निकटवर्तीय व कुटुंबीयांना केलं. यातून त्यांच्या मनातील व संस्कारातील संत तुकाराम महाराजांचा आदर्श दिसून येत असल्याचे त्यांच्या कुटुंबीयांनी म्हटले आहे. तसेच, या दुर्दैवी घटनेनंतर कर्जबाजारीपणाची होणारी चर्चा वेदनादायी व दुःखद असल्याचंही मोरे कुटुंबीयांनी म्हटलं आहे.

शिरीष महाराज मोरेंनी जगाचा निरोप

घेताना, माझ्यामागे प्रत्येकाने दिलेलं कर्ज फेडावं असं म्हणून कोणावर अन्याय होणार नाही, याची दक्षता घेतली. यामार्फत शिरीष महाराजांनी जगद्गुरू संत तुकाराम महाराजांची परंपरा जपली. मात्र, त्यांनी आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केली असं म्हणत चुकीची चर्चा घडवण्यात येत असल्याचं मोरे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. अनेकजण किर्तनावर मोठे होत आहेत, मात्र शिरीष महाराजांनी आजवर मोफत किर्तनसेवा केली. फक्त यावेळी जरा गडबड झाली अन् दुःखाचा डोंगर वारकरी संप्रदायावर कोसळला. शिरीष महाराजांनी एकवेळ आवाज दिला असता तर अख्खा महाराष्ट्र मदतीला नक्कीच धावला असता, अशी खंत ही देहूकर व्यक्त करत आहेत. शिरीष महाराजांनी आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठ्यांचा आधार घेत, देहूरोड पोलीस पुढील तपास करत आहेत.

विशाळगड अतिक्रम हटाव मोहिमेत सहभाग

शिरीष महाराज हे श्री शंभू विचार मंचच्या माध्यमातून ते कार्य करत होते. शिरीष महाराज धर्मवेडे होते, धर्माच्या रक्षणासाठी ते रात्रंदिवस झटणारे व्यक्तिमत्व होते. विशाळगड अतिक्रमण हटविण्याच्या मोहिमेतही त्यांनी मोठा पुढाकार घेतला होता, असे देहू संस्थानचे अध्यक्ष, पुरुषोत्तम महाराज मोरे यांनी म्हटलं आहे. संभाजी महाराजांच्या विषयाचे प्रबोधन ते करायचे, आमचा उगवता तारा मावळल्याने आम्हाला अतिशय दुःख झाल्याचंही पुरुषोत्तम महाराज यांनी म्हटलं.

पुण्याच्या गिर्यारोहकांनी भैरवगड पश्चिम बाजूने केला सर

धनकवडी - सह्याद्रीच्या खोर्यात चढाईसाठी अत्यंत कठीण श्रेणीत गणला जाणारा मोरोशीचा भैरवगड (फ्रंट वॉल) पुण्यातील एडव्हेंचर जंक्शनच्या गिर्यारोहकांनी सर करून भगव्या धव्जासह छत्रपती शिवरायांना अभिवादन केले.माळशेज घाट उतरल्यावर ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील मोरोशी गावच्या दक्षिणेस भैरावगडाची अजस्त्र भिंत दिसते. भूगार्भाच्या परिभाषेत अशा भिंतीना डाईक असे संबोधतात.

पूर्व पश्चिम दिशेत पसरलेल्या या भिंतीची उंची सुमारे ४५० फुट आहे. हि अजस्त्र भिंतच भैरवगड म्हणून ओळखला जातो. या किल्याच्या पश्चिम बाजूच्या कातळ भिंतीवर क्लाईम्बिंग रूट आहे. हा चढाई मार्ग सर करण्यासाठी सर्व आवश्यक उपकरणासह टीम शनिवारी मोरोशी गावात दाखल झाली रात्रीच ट्रेक करून किल्या

जवळ टेंट लाऊन मुक्काम केला. पाहटे मानसिंह चव्हाण यांच्या हस्ते पूजन झाले. त्यानंतर कृष्णा मरगळे आणि लोकेश नाईलकर यांनी लीड क्लाईम्ब करत चढाई सुरु केली.या दोघांनी सुरुवातीचे पहिले दोन स्टेशन म्हणजे तब्बल ३०० फुट ९० अंशातील प्रस्तारारोहन अवघ्या एका तासात पूर्ण केले. त्यांनतर मानसिंह चव्हाण आणि अनंता कोकरे यांनी चढाई सुरु केली. तिसर्या स्टेशन नंतर ट्रॅव्हर्स मारल्यावर सरळउभी क्रॅक (भेग) पार करावी लागते. क्रॅक जवळ बोल्ट लांब असल्याने लोकेश नाईलकरने फ्रेंड्स चोक नट्स यासारख्या अत्याधुनिक उपकरणांचा योग्य वापर करून हा टप्पा पूर्ण केला. पाचव्या स्टेशन नंतर ६०-७० निसरड्या दगड मातीचा ८० अंशातील मुक्त चढाईचा जोखमीचा टप्पा अनुभवी कृष्णाने पार केला आणि टीमने सायंकाळी सहा वाजता शिखर गाठले. शंकर मरगळे यांनी मोहिमेस संपूर्ण टेक्निकल सपोर्ट दिला. चढाईमार्गात मार्गात ओव्हरहँग, ओपन बुक, स्क्री (निसरडी दगडमाती) क्रक्स (अवघड भाग), फ्री क्लाईम्ब (मुक्त चढाई) अशी विविधता आहे. अत्याधुनिक उपकरणांचा योग्य वापर रूट पाहण्यासाठी ड्रोनचा मदत यामुळे मोहीम यशस्वीपणे पार पडली. गडमाथ्यावरून पश्चिमेला नानेघाटाचे टोक व पूर्वेला हरिश्चंद्रगड असा विस्तृत प्रदेश दिसतो. पूर्वी पारंपारिक रिंग बोल्ट वापरून क्लाईम्बिंग केले जात होते. मात्र ते रिंग बोल्ट कालांतराने जंगून जुने झाल्याने चढाई मार्ग धोकादायक झाला होता. २०१२ साली सेफ क्लाईम्बिंग इनिशिएटीव (स्की) या संस्थेने त्याच चढाई मार्गावर काठीण्य पातळी जपून नवीन गंजरोधक बोल्ट लावले आहेत. त्यामुळे चढाई मार्ग सुरक्षित झाला आहे.

एलआयसी पॉलिसीच्या नावाखाली नागरिकांना गंडा, तब्बल ३० बँकांचे

पुणे : एलआयसी पॉलीसीच्या नावाखाली नागरिकांना लाखोंचा गंडा घालणाऱ्या वाकडेवाडी येथील बनावट कॉल सेंटर'चा पर्दाफाश करीत शिवाजीनगर पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. आरोपींकडे पुणे परिसरातील नामांकित ३५ कंपन्यांचे बनावट रबरी शिक्के मिळून आले असून १५ मोबाईल, १५० सिम कार्ड आणि वेगवेगळ्या ३० बँकांचे बँक खाती, चेक बुक मिळाले आहेत. आरोपींनी एलआयसीच्या नावाने बनावट ओळखपत्र तयार केले होते. प्राथमिक तपासात आरोपींनी दोघांची फसवणूक केल्याचे समोर आले असून त्यांच्याकडून आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.

शंकर कारकुन पोखरकर (वय ४२, रा. कात्रज), मेहफूज मेहबुब सिद्दीकी (वय ४०, रा. औंध), अशिष रामदास मानकर (वय ४८, वाघोली) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. पोलीस उपायुक्त संदीपसिंह गील, वरिष्ठ निरीक्षक चंद्रशेखर सावंत, गुन्हे निरीक्षक चंद्रकांत सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक के. बी. डाबेराव, अंमलदार नलिनी क्षिरसागर, रुचिका जमदाडे, स्वालेहा शेख, सरस्वती कांगणे यांच्यासह पथकाने ही कामगिरी केली.

पोखरकर हा मुख्य सूत्रधार आहे. आपण एलआयसी एजंट असल्याचे सांगून जादा परताव्याचा आमिषाने आरोपीने २०२१ मध्ये शिवाजीनगर भागातील एकाकडून ५ लाख ४ हजार रुपये उकळले. काही दिवसांनी पैसे मिळतील असे त्यांना सांगण्यात आले होते. यादरम्यान खात्री करण्यासाठी फिर्यादीने संपर्क साधला असता आरोपींचा फोन बंद लागला. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. याबाबत संबंधित व्यक्तीने २०२३ मध्ये शिवाजीनगर पोलिसांत धाव घेत फिर्याद दिली. तेव्हापासून शिवाजीनगर पोलीस आरोपींच्या मागावर होते. आरोपी सातत्याने राहण्याचे ठिकाण बदलत असल्याने मिळून येत नव्हते.दरम्यान, तांत्रिक तपासावरून शिवाजीनगर सायबर पथकातील अंमलदार आदेश चलवादी, तेजस चोपडे यांनी बनावट कॉल सेंटरचा ठावठिकाणा घेतला. त्यानुसार वाकडेवाडी येथे फ्यूचर ग्लोबल सर्विस नावाने सुरू असलेल्या कॉल सेंटरवर पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत पथकाला येथून विविध कंपन्याचे १५० सिम कार्ड, ३० विविध बँकेचे खाती व चेक बुक, १५ मोबाईल, २९ डाटा रजिस्टर, १२ एटीएम कार्ड, ०५ पॅन कार्ड, ०२ संगणक, ३५ विविध कंपन्यांच्या नावाचे बनावट शिक्के मिळून आले.

मुलाच्या प्रेमाची शिक्षा बापाला; मुलीच्या भावाच्या भयानक कृत्याने पुणे हादरलं!

पुणे । प्रतिनिधी

प्रेमप्रकरणातून मुलाच्या वडिलांचे राहत्या घरातून अपहरण करण्यात आल्याची धक्कादायक घटना हडपसर भागात घडली आहे. अपहरण नाट्यानंतर हडपसर पोलिसांनी केवळ १२ तासात अपर्हत वडिलांची सुखरूप सुटका करत तिघांना बेड्या ठोकल्या आहेत. मुलीच्या भावाने आणि त्याच्या तीन साथीदारांनी मध्यरात्री दुचाकीवरून अपहरण केले होते.

अभिजीत दत्तात्रय भोसले (वय २२), रणजीत रमेश डिकोळे (वय २१) व मारूती अशोक गायकवाड (वय २३) अशी पकडलेल्या तिघांची नावे आहेत. तर, साथीदार सागर खुरंगळे हा पसार असून, त्याचा शोध घेतला जात आहे. याबाबत हडपसर पोलिसांत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई वरिष्ठ निरीक्षक संजय मोगले, पोलीस निरीक्षक (गुन्हे) निलेश जगदाळे, सहाय्यक निरिक्षक अर्जुन कुदळे, उपनिरीक्षक महेश कवळे व त्यांच्या पथकाने केली आहे.

अपर्हत व्यक्ती कुटूंबासह हडपसरमधील विठ्ठलनगर येथे राहण्यास आहे. तर, यातील मुलगी वाघोली भागात राहण्यास आहे. दरम्यान, अपर्हत व्यक्तीच्या मुलाचे व मुलीचे प्रेमसंबंध होते. परंतु, मुलीच्या कुटूंबियांचा त्यांच्या प्रेमास विरोध होता. त्यातच मुलगी ३ फेब्रुवारी रोजी मिळून न आल्याने कुटूंबियांना संबंधित मुलावर संशय आला. त्यामुळे कुटूंब मुलाच्या घरी आले. तेव्हा त्यांच्यात वादविवाद झाले. दोन्ही कुटूंबात वाद झाल्यानंतर मुलीचे कुटूंबिय तेथून निघून गेले.

दरम्यान, रात्री आकराच्या सुमारास पुन्हा मुलीचा एक नातेवाईक व त्याचे इतर तीन साथीदार मुलाच्या घरी आले. त्यांनी जबरदस्तीने मुलाच्या वडिलांना घरातून बाहेर आणले. त्यांना दुचाकीवर बसवत त्यांचे अपहरण केले. अपहरण नाट्यानंतर मुलाच्या आईने पोलीस नियंत्रण कक्षास अपहरणाची माहिती दिली. ही माहिती मिळताच हडपसर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संजय मोगले व त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. घटनेचे गांर्भिय ओळखत परिमंडळ पाचचे उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे व इतर अधिकाऱ्यांनीही घटनास्थळी धाव घेतली.

पोलिसांनी अपहरण कर्त्यांचा शोध सुरू केला. वेगवेगळी पथके तयार करून वाघोली, केसनंद तसेच हडपसर परिसर पिंजून काढला. पण, आरोपींचा शोध लागला नाही. मात्र, बातमीदाराकडून माहिती मिळाली की, आरोपी हे अपर्हत व्यक्तीला घेऊन वाडे बोल्हई व केसनंद परिसरात फिरत आहेत. त्यानूसार, शोध घेत असताना आरोपी वारंवार ठावाठिकाणा बदलत होते. नंतर आरोपी हे सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथे जात असल्याचे समजले. तात्काळ सहाय्यक निरीक्षक अर्जुन कुदळे व पथकाने पाठलाग करून त्यांना पाटस टोलनाका येथे सापळा लवून पकडले. त्याच्या तावडीतून अपर्हत व्यक्तीची सुखरूप सुटका केली. तसेच, आरोपींना ताब्यात घेतले.

एसीबीने 'जीएसटी' कार्यालयातील कर निरीक्षकाला रंगेहात पकडलं

पुणे : राज्यात लाच घेणाऱ्याविरुद्ध मोठ्या प्रमाणात कारवाई होताना दिसत आहे. लाच घेतल्याचे अनेक प्रकार उघडकीस येत आहेत. अशातचं आता वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) कार्यालयातील कर निरीक्षकाला ५ हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागने पकडले आहे. याप्रकरणी येरवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तुषारकुमार दत्तात्रय माळी (वय ३३) असे कर निरीक्षकाचे नाव आहे. याप्रकरणी माळी यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला आहे. याबाबत वकिलाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (एसीबी) तक्रार दिली होती.

तक्रारदार वकिलाचा अशील व्यापारी आहे. व्यापाऱ्याचा जीएसटी क्रमांक रद्द करण्यात आला होता. जीएसटी क्रमांक मिळवण्यासाठी वकिलाने अशिलामार्फत जीएसटी कार्यालयात अर्ज दाखल केला होता. माळीने वकिलाकडे ५ हजार रुपयांची लाच मागितली. त्यानंतर वकिलाने याबाबत एसीबीकडे तक्रार दिली. लाचलुचपत प्रतिबंधक सापळा लावून वकिलाकडून पाच हजारांची लाच घेणाऱ्या माळी यांना पकडले. पोलीस अधीक्षक शिरीषकुमार सरदेशपांडे, यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

पुण्यात 'या' तारखेपासून रंगणार राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा; हिंदू गर्जना प्रतिष्ठान, पुनीत बालन ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने आयोजन

पुणे । प्रतिनिधी

हिंदू गर्जना प्रतिष्ठान व पुनीत बालन ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने 'हिंदू गर्जना चषक महिला व पुरुष राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा २०२५ येत्या दि. ७ ते ९ फेब्रुवारी या कालावधीत रंगणार आहे. या कुस्ती स्पर्धेसाठी तब्बल ४५ लाखांची बक्षिसे असून खुल्या विजेत्याला महिंद्रा थार गाडी, चांदीची गदा आणि २ लाख ५१ हजारांचे बक्षिस दिले जाणार आहे. पुनीत बालन ग्रुपचे अध्यक्ष पुनीत बालन आणि हिंदू गर्जना प्रतिष्ठानचे अध्यक्ष धीरज रामचंद्र घाटे यांनी पत्रकार परिषदेत या स्पर्धेविषयी माहिती दिली. शिक्षण प्रसारक मंडळीच्या सहकार्याने आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ व पुणे जिल्हा कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने ही स्पर्धा होणार आहे.

टिळक रस्त्यावरील स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर होणाऱ्या या स्पर्धेत खुला गट हा राज्यस्तरीय पुरुष आणि महिला असा असणार असून इतर गट पुणे शहर आणि जिल्हा अशा स्वरूपाचा असणार आहे. खुल्या गटातील पुरुष विजेत्याला महिंद्रा थार, चांदीची गदा आणि २ लाख ५१ हजार आणि स्मृतीचिन्ह असे बक्षीस देण्यात येणार आहे.

तर दुसऱ्या क्रमांकाला १ लाख ५१ हजार आणि स्मृतीचिन्ह आणि तृतीय क्रमांकाला १ लाख ५१ हजार असे बक्षीस देण्यात येणार आहे. तर खुल्यातील गटातील महिला विजेत्याला २ लाख ५१ हजार ई- बाईक आणि चांदीची गदा, द्वितीय क्रमाकांच्या विजेत्याला चषक आणि १ लाख ५१ हजार आणि तृतीय क्रमांक विजेत्याला चषक आणि १ लाख असे बक्षिसाचे स्वरूप आहे.

तर कुमार गटातील कुस्ती स्पर्धा पुणे शहर आणि जिल्ह्यातील पैलवानांसाठी असणार आहे. त्यामधील पहिल्या क्रमांकाच्या विजेत्याला चांदीची गदा आणि १ लाख, द्वितीय क्रमांक विजेत्याला ५० हजार आणि चषक आणि तृतीय क्रमांक विजेत्याला २५ हजार आणि चषक अशा स्वरूपाची बक्षिसे देण्यात येणार आहेत. याशिवाय कुमार गटातील वय वर्ष १७ आणि वय वर्ष १४ च्या खालील गटातील पहिल्या क्रमांकाच्या विजेत्यांना सायकल आणि रोख पारितोषिक देण्यात येणार आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवारी (दि.७) रोजी सायंकाळी ५ वाजता राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते होणार असून यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्ता मामा भरणे हे उपस्थित राहणार आहेत. तर स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ अन्य मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. तर इराणचे मल्ल मिर्झा आणि आली यांचा प्रेक्षणीय सामना या स्पर्धे दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. तर अनेक हिंदकेसरी महाराष्ट्र केसरी उपस्थित राहणार असून या निमित्ताने त्यांचाही विशेष गौरव करण्यात येणार आहे.

या स्पर्धेसाठी स. प. महाविद्यालयात मातीचे दोन स्वतंत्र आखाडे असणार असून जवळपास १० हजार प्रेक्षकांची बसण्याची सोय होईल असे भव्य स्टेडियम उभारण्यात आले आहे. तसेच वाहनांच्या पार्किंगसाठी मोठी व्यवस्था करण्यात आली आहे. स्पर्धेसाठी येणाऱ्या पुरुष आणि महिला पैलवानांसाठी राहण्याची आणि भोजनाची सोय आयोजकांच्यावतीने करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र केसरीच्या तोडीस तोड ही स्पर्धा आयोजित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. या स्पर्धेसाठी नामवंत खेळाडू, कलावंत, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार असल्याचे धीरज घाटे आणि पुनीत बालन यांनी सांगितले. पुणेकरांनी या स्पर्धेसाठी उपस्थित राहून मातीतील कुस्तीचा थरार अनुभवावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

पुणे हादरलं! ग्राहकाचा भाजी विक्रेत्यावर चाकूने हल्ला

पुणे । प्रतिनिधी

राज्यात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून गुन्हेगारीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता भाजी खरेदी करताना झालेल्या वादातून ग्राहकाने भाजी विक्रेत्यावर चाकूने वार केल्याची घटना खडकीतील संजय गांधी भाजी मंडईत घडली आहे. मनोज स्वामी (रा. इंदिरानगर, खडकी) असे गुन्हा दाखल केलेल्या ग्राहकाचे नाव आहे. या हल्ल्यात भाजी विक्रेते शौकत बाबामियाँ (वय ३६) गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, शौकत यांचा खडकीतील संजय गांधी भाजी मंडईत भाजी विक्रीचा व्यवसाय आहे. मनोज मंगळवारी रात्री साडेआठच्या सुमारास भाजी खरेदीसाठी आला. भाजी खरेदी करताना मनोजने त्यांच्याशी वाद घातला. बाचाबाचीतून त्याने चाकूने शौकत यांचा गळा आणि चेहऱ्यावर चाकूने वार केला. गंभीर जखमी झालेल्या शौकत यांना मंडईतील भाजी विक्रेत्यंनी रुग्णालयात दाखल केले. मनोज पसार झाला असून, अधिक तपास सहायक निरीक्षक अर्जुन बेंद्गुडे करत आहेत.